रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८८ । अंक ७३ । पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)   www.krushival.in

# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. १० ऑगस्ट २०२४

किंमत ४ ₹

## मोदी सरकारही पडणार-चव्हाण

**मुंबई :** महागाई, बेरोजगारी, कोलमडलेली आरोग्य व्यवस्थेमुळे भाजपला लोकसभा निवडणुकीत फटका बसला. महाराष्ट्र आणि हरियाणातील विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्याने केंद्रातील सरकार अटल बिहारी वाजपेयी सरकारप्रमाणे १३ महिन्यात पडण्याची शक्यता आहेत. त्यामुळे राज्यातील सत्ताधाऱ्यांना लाडकी बहिण योजना आठवली आहे, अशी टीका माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केली. रुग्ण हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष उमेश चव्हाण यांनी लिहिलेल्या हॉस्पिटलचे बिल माफ करावे? या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन पृथ्वीराज चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय •> पान ५ वर

## ‘लोकसभेचा झटका जोरदार लागला’

**येवला :** लोकसभेला दिलेला झटका जोरदार लागला आहे. कंबर मोडायची वेळ आहे. चूक झाली माफ करा. जो काम करतो तोच चुकतो. अब की बार ४०० पार मुळे देखील झटका लागला आहे, अशी कबुली अजित पवार यांनी दिली. अजित पवार गटाची जन सन्मान यात्रा आज येवल्यात पार पडली. यावेळी अजित पवारांनी विविध विषयांवर भाष्य केले. त्यांनी गुरुवारी (दि.८) नाशिकमधून ही यात्रा सुरू केली होती. शुक्रवारच्या कार्यक्रमात त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला आणि लोकसभा निवडणुकीतील निकालावर खंत व्यक्त केली. कांदा निर्यात आणि व्यापाऱ्यांचे मुद्दे-कांदा निर्यातीबाबत ते म्हणाले, •> पान ५ वर

# माकडचाळे आणि महाचोर

### उमेदवारीवरुन शिंदेगट भाजपामध्ये जुंपली

### लाज, शरम खुंटीला, मतदारांच्या मनात छी-थू

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

**जिल्ह्यातील सात विधानसभा मतदार संघापैकी अलिबाग आणि पेण विधानसभा मतदार संघाच्या दाव्यावरुन शिवसेना शिंदे गट आणि भाजपामध्ये उभी फुट पडली आहे. एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करताना दोन्ही गटाच्या नेत्यांकडून लाज, शरम खुंटीला टांगण्यात आल्याने मतदारांमध्ये त्यांच्याविषयी छी-छी-थू-थू होत आहे. आमदारकीसाठी एक दुसऱ्याचे चारित्र्य हनन करणाऱ्यांकडे अलिबाग आणि पेण विधानसभेची सूत्रे द्यायची का, असा गंभीर प्रश्न त्या निमित्ताने मतदारांच्या मनात निर्माण झाला आहे.**



आगामी कालावधीत विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे. महायुतीच्या ठरावानुसार अलिबाग, कर्जत आणि महाड विधानसभा मतदार संघात शिवसेना शिंदे गटाचा उमेदवार निवडणूक लढणार आहे. उरण, पनवेल आणि पेण विधानसभा मतदार संघ भाजपाकडे, तर श्रीवर्धन मतदार संघातून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) निवडणूक लढणार आहेत. असे असताना मात्र, उमेदवारीवरुन शिंदे गट आणि भाजपा यांच्यामध्ये चांगलीच जुंपली आहे.

अलिबागमध्ये शिंदे गटातील जिल्हा कार्यकरिणीची सभा पार पडली. या बैठकीतून भाजपाला थेट आव्हान देण्यात आले. जिल्हा प्रमुख राजा केणी यांनी भाजपाचे दिलीप भोईर (छोटम) यांच्यावर खालच्या पातळीवर टीका केली. भोईर यांनी माकडचाळे थांबवावेत. पेणमधील प्रसाद भोईर यांनीदेखील जास्त उड्या मारल्या तर पेणमध्ये शिंदे गटाचा उमेदवार उभा करु, असा इशारा दिला आहे. भाजपाने स्वतःच्या कार्यकर्त्यांना वेळीच आवरावे अन्यथा ठिक होणार नाही, असा त्यानी दम भरला आहे. बैठकीमध्ये अलिबाग आणि मुरूडच्या विकासाच्या मुद्याबाबत काही चर्चा होईल, राजकारणात काही चांगले मार्गदर्शन मिळेल, असे वाटले होते, मात्र आलेल्या पदाधिकारी कार्यकर्त्यांचा अंतर्गत वादामुळे चांगलाच हिरमोड झाल्याचे दिसले.

### राजा केणी महाचोर; भोईरांनी केला भांडाफोड

**राजा केणी यांना प्रत्युत्तर देताना दिलीप भोईर यांनी राजा केणी यांच्यावर जोरदार प्रहार केला. विकासाच्या नावावर खोटी बिले काढणारा तू, आम्हाला काय ज्ञान शिकवतोस. तू महाचोर आहेस. गेल्या पाच वर्षात तुमच्या आमदारांनी कोणती विकासकामे केली, साधी आमसभा लावण्यासही आमदार असमर्थ ठरले, अशी संतप्त प्रतिक्रिया भोईर यांनी व्यक्त केली. शुक्रवारी जागतिक आदिवासी दिनानिमित्त अलिबाग-सहाण येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी भोईर यांनी स्थानिक आमदार महेंद्र दळवींसह राजा केणी यांच्यावर टीकास्त्र सोडले. पाच वर्षात तुम्ही आमसभा बोलवली नाही. जनतेचे प्रश्न तुम्ही काय सोडवणार, असा सवालही त्यांनी केला.**

# अलिबागमध्ये रॅलीतून आदिवासी दिन साजरा

### असंख्य आदिवासी समाज एकवटला

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

जागतिक आदिवासी दिनानिमित्त अलिबागमध्ये रॅलीचे आयोजन करण्यात आले. पारंपरिक वेशभुषा, नृत्यांचे सादरीकरण करीत असंख्य आदिवासी समाज या निमित्ताने एकवटला. संपुर्ण शहरात रॅली काढण्यात आली. या रॅलीला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.



आदिवासींच्या हक्काचे समर्थन व संरक्षण करण्याबरोबरच जागरुकता वाढविण्यासाठी जागतिक आदिवासी दिन साजरा केला जातो. यंदाही अलिबागमध्ये जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यात आला. बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून या रॅली सुरुवात करण्यात आली. ही रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून सुरु झाली. रॅलीसोबत पारंपारिक वाद्यांचे सादरीकरण करण्यात आले. आदिवासी गीतांचेदेखील सादरीकरण करीत आदिवासी समाजाचे महत्व जनतेपर्यंत पटवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. ठिकरूळ नाका, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बालाजी नाका ते शेतकरी भवन अशी ही रॅली काढण्यात आली.




### आजचा अग्रलेख

**दादा, तुमची बस चुकली**

### वे|ध|क

## क्रेनची ट्रॉली तुटली; पाटील, कोल्हे बचावले

**पुणे :** शिवस्वराज्य यात्रेला शिवनेरी किल्ला येथून प्रारंभ झाला. क्रेनच्या सहाय्याने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून क्रेनखाली येत असताना क्रेनची ट्रॉली तुटली. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार अमोल कोल्हे, रोहिणी खडसे, मेहबुब शेख थोडक्यात बचावले. सुदैवाने यात कोणाला दुखापत झाली नाही.

आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने सर्वच राजकीय पक्षांनी मोठी तयारी सुरू केली आहे. एकीकडे राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार) राज्यभरात •> पान ५ वर

# ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा मोर्चा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या मान्य करण्यासाठी गेल्या अनेक वर्षापासून कर्मचारी लढा देत आहेत. मात्र त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करीत कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी (दि.९) रायगड जिल्हा परिषदेवर ग्रामपंचायत कर्मचारी मोर्चा काढला. अलिबागमधील कर्मचारी सदनापासून मोर्चाला सुरुवात करण्यात आली. यावेळी सरकारविरोधात घोषणा देत निषेध व्यक्त करण्यात आला.

सरकारचे लक्ष वेधण्यासाठी रायगड जिल्हा ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेने मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला. मारूती नाका ते जिल्हा परिषद कार्यालय असा हा मोर्चा काढण्यात आला. •> पान ५ वर



### कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे लक्ष द्या

**रायगड जिल्ह्यामध्ये ८१० ग्रामपंचायती आहेत. या ग्रामपंचायतीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या साधारणतः एक हजारहून अधिक आहे. हे कर्मचारी घरपट्टी, पाणी पट्टी वसूल करणे, कार्यालयासह परिसराची स्वच्छता राखणे, पाणी पुरवठा करणे, जलसुरक्षा रक्षक, केंद्रस्तरिय अधिकारी म्हणून काम करणे, आपत्कालीन परिस्थितीत रात्रीचा दिवस करून मदतीसाठी धावणे, शासनाच्या वेगवेगळ्या योजना जनतेपर्यंत पोहचविणे अशा अनेक प्रकारची कामे हे कर्मचारी करतात. तुटपुंज्या मानधनावर हे कर्मचारी कामे करतात. कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या मान्य करण्यासाठी रायगड जिल्हा कर्मचारी संघटना गेल्या अनेक वर्षापासून सरकारकडे पाठपुरावा करीत आहेत. परंतु सरकारकडून फक्त आश्वासने दिली जातात. प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे. या मागण्यांकडे लक्ष द्या, अशी मागणी होत आहे.**

## शिर्डी विमानतळाला जप्तीची नोटीस

**शिर्डी :** शिर्डी येथील साईबाबा देवस्थान देशभर प्रसिद्ध झाले आहे. देशातील दुसऱ्या क्रमांकाचे श्रीमंत देवस्थान शिर्डी आहे. यामुळे शिर्डीत देशभरातून भाविक येत असतात. त्यासाठी शिर्डीसारख्या छोट्या शहराचा विकास चांगला करण्यात आला. रेल्वे स्टेशन आणि विमानतळ सुरु करण्यात आले. त्याच शिर्डीतील विमानतळाला आता नोटीस देण्यात आली आहे.

आठ कोटी तीस लाखांचा कर थकल्याप्रकरणात शिर्डी विमानतळाला ही नोटीस शिर्डी ग्रामपंचायतीने बजावली आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम १२९ अन्वये ही नोटीस बजावल्यामुळे खळबळ निर्माण झाली •> पान ५ वर

### नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प

# ४०० सुरुंग स्फोटाला ग्रामस्थांचा विरोध

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. पुढील वर्षी मार्च अखेरपर्यंत विमानतळावरुन पहिले विमान उड्डाण होण्यासाठी युद्धपातळीवर सिडको मंडळ व अदानी समुह दिवसरात्र काम करत आहे. तीन दिवसांपूर्वी प्रकल्पाचे काम सूरु असलेल्या ठिकाणी धडाधड झालेल्या सुरुंग स्फोटामुळे ग्रामस्थांनी स्फोटकाचे काम रोखून धरले. ही बाब सिडको मंडळ व अदानी समुहाच्या अधिकाऱ्यांनी पनवेल शहर पोलिसांच्या ध्यानात आणून दिल्यावर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, म्हणून पोलिसांनी संतापलेल्या ग्रामस्थ आणि प्रकल्प अधिकारी यांच्यात संवाद घडवून आणला. त्यानंतर त्याच बैठकीत स्फोटांचे नियोजन आखून दिल्याने काम पुन्हा सुरू करण्यात आले. काही दिवसात शेवटचे ४०० स्फोट करायचे असल्याने दरदिवशी •> पान ५ वर

■ **पोलिसांच्या मध्यस्थीनंतर स्फोटांचे नियोजन**



# २०० रुपयांसाठी हत्या; आरोपी अटक

**पनवेल :** तालुक्यातील शिरढोण गावाजवळ मुंबई गोवा महामार्गावरील महिंद्रा ट्रॅक्टर शोरुम शेजारी गुरुवारी सकाळी ९ वाजता ४६ वर्षीय व्यक्तीचा मृतदेह आढळल्याने एकच खळबळ माजली होती. मृत व्यक्तीचे नाव सुशांत कुमार कृष्णा दास असे आहे. सुशांतचा गळा चिरुन त्याची हत्या करण्यात आली होती. याप्रकरणी नवी मुंबई गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलिसांनी अवघ्या काही तासांत हत्या करणाऱ्या २० वर्षीय अमित रामक्षय राय याला अटक केली आहे. अमित व सुशांत एकाच हॉटेलमध्ये काम करत होते. अवघ्या दोनशे रुपयांच्या वादातून हत्या झाल्याचे अमितने पोलिसांना दिलेल्या जबाबात कबूल केले.

मृत सुशांत शिरढोण येथील साईप्रसाद हॉटेलमध्ये स्वयंपाकघराचा •> पान ५ वर




# कोकणची सुरक्षा मजबूत होणार

### रत्नागिरी लोहमार्ग पोलीस ठाण्याला मंजूरी

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

कोकण रेल्वे मार्गावर वाढते गुन्हेगारीचे प्रमाण लक्षात घेता कोकण रेल्वे प्रवाशांची सुरक्षा आणि गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी कोकणातील रोहा, कणकवली आणि रत्नागिरी या तीन ठिकाणी लोहमार्ग पोलीस ठाणी प्रस्तावित होती. त्यापैकी रत्नागिरी येथे लोहमार्ग पोलीस ठाण्याला शासनाने मंजुरी दिली आहे. शासनाने यासाठी ९१ लाख ७० हजारांचा निधी मंजूर केला असून १५२ अधिकारी, कर्मचाऱ्यांची पदनिर्मिती करण्यात येणार आहे. शासनाच्या गृह विभागाने याबाबतचा अद्यादेश शुक्रवारी जारी केला आहे. त्यामुळे कोकण रेल्वे मार्गावरील गुन्हेगारीच्या प्रमाणाला आळा बसणार आहे.

रेल्वे सुरक्षा अधिक मजबूत होणार आहे. मुंबई उपनगरीय रेल्वेच्या हद्दीतील स्थानके, प्रवाशांची सुरक्षा आणि गुन्ह्यांचा तपास करण्याची जबाबदारी लोहमार्ग पोलिसांवर आहे. रेल्वेच्या मालमत्तेची सुरक्षा रेल्वे सुरक्षा दलाच्या अखत्यारित आहे. सध्या लोहमार्ग पोलिसांची हद्द सीएसएमटी ते पनवेल आणि कर्जत, खोपोली, मंकीहिलपर्यंत आहे. रोह्यापासून पुढे कोकण रेल्वेची हद्द सुरू होते. याहद्दीतील सुरक्षेची जबाबदारी रेल्वे सुरक्षा दलावर आहे. मुंबईच्या दिशेने •> पान ५ वर





# सरपंचांच्या अपात्र निर्णयाला स्थगिती

**। उरण । वार्ताहर ।**

जिल्हाधिकारी यांनी अनधिकृत बांधकामाचा ठपका ठेवून जसखार ग्रामपंचायत सरपंच काशीबाई ठाकूर यांना अपात्र ठरविले होते. त्याविरोधात काशीबाई ठाकूर यांनी अतिरिक्त विभागीय आयुक्त कोकण विभाग, मुंबई यांच्याकडे अपील करून दाद मागितली. त्यावेळी अतिरिक्त विभागीय आयुक्त विकास पानसरे यांनी या निर्णयाला स्थगिती दिल्याने सरपंचपदी काशीबाई ठाकूर यांना कायम ठेवण्याचा निर्णय दिला. त्यामुळे काशीबाई ठाकूर यांनी गुरुवारी पुन्हा सरपंचपदाचा पदभार स्वीकारला आहे.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सुधीर उर्फ सूरदास लक्ष्मण नांदगांवकर रा. बोरिवली, मुंबई यांचे कडून कायम विकत घेण्याचे ठरविलेले आहे. खालील वर्णन केलेली मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नांव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| मौजे मांडला<br>ता. मुरूड<br>जि. रायगड | १२८/२ | ०.२०.६०<br>०.०२.२०<br>०.२२.८० | ४.१३ |

तरी सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाण, दान, लिज, पोटगी, साठेकरार, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज, बयाणापावती, पोटगी, लीन, चार्ज, बक्षीस, मृत्यूपत्रांकीत दान वगैरे असल्यास अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकती संबंधीच्या लेखी प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून चौदा दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर वर वर्णन केलेल्या मिळकती बाबत कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही हे सर्वास कळावे.

अलिबाग,
दि.९/०८/२०२४.

सही/-
**ॲड. मनोज प्रभाकर पाटील**
शॉप नं. ११, भास्कर को. ऑप. हौसि. सोसा.,
रामनाथ रोड, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड.

### जाहीर नोटीस
**पेण येथिल मे. तहसीलदार साहेब यांचे कोर्टात**

चौ.अर्ज.नं. /२०२४

श्री. नरेश बाळाराम पाटील
वय ५३ वर्ष, धंदा-शेती, — अर्जदार
रा. कांदळे, पो. कांदळे पाडा,
ता.पेण, जि.रायगड

विरुध्द

ग्रुप ग्रामपंचायत कांदळे — सामनेवाला
तर्फे ग्रामसेवक

सर्व जनतेस या जाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की,

अर्जदार यांची मुलगी कुमारी प्रणाली नरेश पाटील हिचा जन्म दि. १४/०२/२०१७ रोजी कांदळे,ता.पेण,जि.रायगड येथे झालेला आहे. परंतू तिच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत कांदळे यांच्या जन्म रजिस्टरमध्ये झालेली नाही. तशी नोंद व्हावी या करिता अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

सदर अर्जाचे कामी कोणालाही हरकत दाखल करण्याची असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्याचे तारखे पासून पंधरा दिवसांच्या आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्या सहित स्वतः या न्यायालयात हजर राहून या अर्जाचे कामी लेखी हरकत नोंदवावी. मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही, अर्जदार यांची मुलगी कुमारी प्रणाली नरेश पाटील हिच्या जन्म दि. १४/०२/२०१७ रोजी, कांदळे, ता.पेण, जि.रायगड येथे झालेला आहे म्हणून तिच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत कांदळे यांच्या जन्म रजिस्टरमध्ये करण्याचे आदेश पारित करण्यात येतील.

यांची संबंधितांनी नोंद घ्यावी.

पेण
दि.१०/८/२०२४ (शिक्का)

**तहसीलदार पेण**
सही/शिक्का

# अग्निशमक दलाच्या ताफ्यात बुलेट

**। खोपोली । वार्ताहर ।**

खोपोली नगरपरिषद अग्निशमन विभागाची कार्यक्षमतेत वाढ होऊन अधिक जलदगतीने शहरात यंत्रणा पोहोचावी या उद्देशाने स्थानिक नागरिकांच्या सोयीकरिता शासनाकडून दोन फायर बुलेट गाडी अग्निशमन यंत्रणेच्या ताफ्यात आल्या आहेत.

सरकारच्या या निर्णयामुळे खोपोली नगरपरिषदेला आपत्ती व्यवस्थापनात एक नवा आधार मिळाला आहे. फायर बुलेटच्या समावेशनामुळे खोपोली नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाची कार्यक्षमता वाढेल. या साधनामुळे आपत्कालीन परिस्थितीत आग विझवणे आणि



जीव तसेच मालमत्तेचे रक्षण करणे अधिक सुलभ होईल. या वाहनांवर असलेल्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे आग नियंत्रणाच्या प्रक्रियेत जलदगतीने आणि परिणाम कारकतेत सुधारणा होईल, असे मत मुख्याधिकारी यांनी व्यक्त केले. या गाडीचे लोकार्पण मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांच्या माध्यमातून अग्निशमन विभागाच्या ताब्यात देण्यात आले. त्यावेळी अग्निशमन विभाग प्रमुख गौतम भगळे, जितेंद्र गोमासे, रमेश गवारणे उपस्थित होते.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**




युवक-युवतींना शिक्षणानुरूप रोजगाराच्या संधी मिळाव्यात यासाठी राज्यात मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यातील अलिबाग वाघोली येथील चैतन्य अनिल पवार या २८ वर्षीय आदिवासी युवकाची रायगड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागात नियुक्ती करण्यात आली आहे. चैतन्यचे शिक्षण स्थापत्य अभियांत्रिकी पदवीपर्यंत झाले असून, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या हस्ते त्याला नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले.

राज्यातील अनेक उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगाराची संधी उपलब्ध आहे. मात्र, युवकांना शिक्षणानंतर अनुभवाअभावी पूर्णवेळ रोजगार मिळण्यात अडचणी निर्माण होतात. ही बाब लक्षात घेऊन राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार मिळविण्याची क्षमता वाढविण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थींना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे म्हणजे १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना सहा हजार, आयटीआय, पदवीकाधारक विद्यार्थ्यांना आठ हजार तर पदवीधर, पदव्युत्तर विद्यार्थ्यांना १० हजार विद्यावेतन दरमहा डीबीटी पद्धतीने देण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत शासनाच्या विविध विभागांमध्ये युवकांची नियुक्ती करण्यात येत आहे. इच्छुक युवकांनी शासकीय कार्यालयात प्रत्यक्ष संपर्क साधून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी केले असून, जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागात चैतन्य पवार या युवकाची नियुक्ती करण्यात आली आहे.

**योजनेसाठी आवश्यक पात्रता**
- उमेदवाराचे किमान वय १८ व कमाल ३५ वर्ष असावे.
- उमेदवाराची किमान शैक्षणिक पात्रता १२ वी पास असावी.
- उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा.
- उमेदवाराची आधार नोंदणी असावी.
- उमेदवाराचे बँक खाते आधार संलग्न असावे.
- आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर नोंदणी करुन रोजगार नोंदणी क्रमांक प्राप्त केलेला असावा.

# जेएनपीए परिसरात वाहनचालकांचे प्रबोधन



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

न्हावा-शेवा वाहतूक शाखेच्या वतीने जेएनपीए परिसरातील ट्रेलर, रिक्षा आदी वाहनचालकांना रस्ता सुरक्षा व वाहतुकीच्या नियमांची माहिती देऊन प्रबोधन केले.

जेएनपीए परिसरातील क्रिश फूड इंडस्ट्री, पीयूबी जंक्शन, जेएनपीटी एसईझेड आदी ठिकाणी प्रबोधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी विविध कंपन्यांचे कर्मचारी व ट्रेलर, रिक्षा चालक आदी उपस्थित होते. उपस्थितांना न्हावा-शेवा वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जी.एम. मुजावर यांनी रस्ता सुरक्षा व वाहतुकीचे नियमांची माहिती देऊन प्रबोधन केले.

# केतन डिंगळेचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन

**सुधागड-पाली, वार्ताहर**

सुधागड तालुक्यातील पंचशीलनगर पाच्छापूर गावचा रहिवासी केतन दिलीप डिंगळे या युवकाचे दि. ४ ऑगस्ट रोजी वयाच्या २९ व्या वर्षी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले आहे. त्याच्या निधनाबद्दल तालुक्यात शोक व्यक्त केला जात आहे. आंबेडकरी चळवळीतील हा युवक सुधागड तालुका रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया युवक आघाडीचा युवा कार्यकर्ता होता. कुरिअरमध्ये काम करीत असल्याने तो सर्वांना परिचित होता.

रविवारी, दि.४ ऑगस्ट रोजी सकाळी त्याची तब्येत अचानक बिघडल्याने त्याला पाली येथे उपचारासाठी आणण्यात आले. मात्र, त्याला हृदयविकाराचा त्रास जास्त वाढल्याने डॉक्टरांनी तात्काळ पुढे नेण्यास सांगितले. केतनला रोह्यात पुढील उपचारासाठी नेत असताना वेळेअभावी अर्ध्या रस्त्यातच त्याची प्राणज्योत मालवली. मात्र, केतनच्या निधनाला सुधागड तालुक्याची अपुरी आरोग्य सेवा व वेळेवर न मिळणारी उपचार पद्धती जबाबदार असल्याची भावना त्याच्या नातेवाईकांनी व्यक्त केली. सुधागड तालुक्यात शासनाची अपुरी आरोग्य सेवा व रुग्णांना वेळीच न मिळणारे उपचार अशा पद्धतीने अनेकांना आपले जीव गमवावे लागले आहेत. केतनच्या बाबतीतदेखील असेच घडले. त्याला वेळीच उपचार मिळाला असता तर त्याला आपला जीव गमवावा लागला नसता. केतनच्या पश्चात आई, वडील व बहीण असा परिवार आहे.

# आदिवासींच्या वनहक्काचे संरक्षण व्हावे

## अंकुर ट्रस्ट, लोकमंच संघटनेमार्फत प्रांताधिकाऱ्यांना निवेदन

**। पेण । प्रतिनिधी ।**

दरवर्षी ९ ऑगस्ट हा आंतरराष्ट्रीय आदिवासी दिवस म्हणून साजरा केला जातो. आदिवासी समाजाची संस्कृती, भाषा, मूल्य जपण्यासाठी व लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी हा दिवस पाळला जातो, अशी माहिती आदिवासी नेत्या डॉ. वैशाली पाटील यांनी दिली. महाराष्ट्रात ९.३५ टक्के आदिवासी आहेत. यामध्ये कातकरी ही जमात आदिम म्हणून गणली जाते.



आदिवासी दिनाचे औचित्य साधून अंकुर ट्रस्ट या स्वयंसेवी संस्थेमार्फत व लोकमंच संघटनेद्वारे आदिवासी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, महिला नेत्यांच्या शिष्टमंडळामार्फत उपविभागीय अधिकारी पेण यांची भेट घेऊन त्यांच्यामार्फत सरकारकडे विविध मागण्या मांडल्या आहेत. या निवेदनातून आदिवासींच्या विशेष मागण्यांकडे लक्ष वेधण्यात आले आहे. या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, आदिवासीमधील आदिवासीपण हे जल, जंगल, जमीन यांच्याविषयी आदिवासीची आत्मीयतेमुळे टिकून आहे. यामुळे वनहक्क मान्यता कायद्याच्या अंमलबजावणीला विशेष महत्त्व आहे. परंतु, धक्कादायक बाब म्हणजे, पेणसहित इतर रायगडमधील कायद्याने अपेक्षित असलेल्या उपस्तर वनहक्क समित्या बरखास्त झाल्या आहेत.



**निवडक**

### आरोग्य शिबीर संपन्न

**नागोठणे :** पळस ग्रामपंचायतीच्या वतीने आणि वडखळ येथील संजीवनी मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल यांच्या सहकार्याने पळस येथील अंगणवाडीच्या इमारतीमध्ये एक आरोग्य विषयक शिबीर आयोजित करण्यात आले. विविध आजारांच्या बाबतीत ११० नागरिकांची यावेळी आरोग्य तपासणी करण्यात आली. या नागरिकांना संजीवनी हॉस्पिटलच्या वतीने औषधांचे वाटपही करण्यात आले. पळस येथील या आरोग्य शिबिराचे उद्घाटन शिवराम भाऊ शिंदे यांच्या हस्ते झाले.

### मृतदेह आढळल्याने खळबळ

**पनवेल :** पनवेल जवळील चिंचवण उड्डाण पुलाखाली रस्त्याच्या नजिक एका इसमाचा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. तालुक्यातील चिंचवण गावाच्या हद्दीत असलेल्या उड्डाण पुलाखाली जेडब्ल्यूसी गेटच्या परिसरात रक्ताच्या थारोळ्यात उपडा पडलेला एक इसम येथील रहिवाशांना आढळून आला. याबाबतची माहिती त्यांनी त्वरित पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे यांना दिली.

### गावठी हातभट्टी नष्ट

**पनवेल :** जंगलातील आंब्याच्या झाडाखाली लहुचीवाडी येथे बेकायदेशीररित्या गावठी हातभट्टीची दारु गाळण्याकरिता बेकायदेशीर भट्टी लावून गावठी दारु तयार केल्याची माहिती पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि अनिल पाटील यांना मिळाली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक हर्षद राजपूत, पोह.समीर तांडेल, पोना.सचिन होळकर, पोशि.राजकुमार सोनकांबळे, पोशि.भिमराव खताळ आदींच्या पथकाने ४० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल व ड्रम नष्ट केला आहे.

### तुर्भे येथून इसम बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक इसम कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार तुर्भे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. निखील रविकांत उपाध्याय असे या इसमाचे नाव असून रंग गोरा, उंची ५ फुट, केस वाढलेले, चेहरा गोल, डोळे काळे, दाढी वाढलेली आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी तुर्भे पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक किरण वाघ मो.नं.९९७०१५९२९८ येथे संपर्क साधावा.

### पुरणपोळी साहित्य, छत्री वाटप

**पनवेल :** कळंबोली वसाहत येथे महिला वर्गाला मोठ्या प्रमाणात पुरणपोळी साहित्य व छत्री वाटप केले. कळंबोली येथे शहर संघटीका ज्योती मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली महिला पदाधिकारी यांना पुरणपोळी साहित्य वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाला उपजिल्हा संघटिका रेवती सकपाळ आणि महानगर संघटीका लीना गरड यांनी उपस्थिती लावली. तसेच आज लीना गरड यांच्याकडून सर्व महिला पदाधिकारी यांना छत्री वाटप करण्यात आले.




## नेरळ ग्रामपंचायतीला
# प्रशासकाची प्रतीक्षा

- **ग्रामपंचायतीचा कारभार सरपंचांकडे**
- **अहवालानंतरही कारवाईला होतोय विलंब**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ ग्रामपंचायतीमधील सर्व १५ सदस्यांचे राजीनामे मंजूर झाले आहेत. राजीनामा नाट्य आणि नंतर ते मंजूर होण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. मात्र आजही एकमेव लोकप्रतिनिधी असलेल्या सरपंच उषा पारधी या सरपंच पदावर कायम आहेत. त्यामुळे ग्रामपंचायतीमध्ये प्रशासक कधी येणार असा प्रश्न नेरळकर उपस्थित करीत आहेत.

कर्जत पंचायत समितीने ग्रामपंचायत बरखास्त करण्याचा अहवाल रायगड जिल्हा परिषदेकडे पाठवला आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून प्रशासक यांची नियुक्ती कधी होणार याकडे लक्ष लागून राहिले आहे.

नेरळ ग्रामपंचायत मधील १६ पैकी १५ सदस्यांनी १८ जुलै रोजी सरपंच उषा पारधी यांच्या कारभाराला कंटाळून राजीनामा दिला आहे.त्यानंतर २९ जुलै रोजी सर्व राजीनामा पत्रांची पडताळणी झाली आणि राजीनामे मंजूर झाले. मात्र त्यानंतर पुढील सात दिवसात राजीनामा देणारा सदस्य हरकत घेऊन न्यायालयात जाऊ शकतो आणि त्यासाठी मुदत असते. ही मुदत चार ऑगस्ट रोजी संपली असून सर्व अहवाल कर्जत पंचायत समितीला ग्रामविकास अधिकारी यांच्याकडून सादर करण्यात आला आहे.

> आम्ही सर्व सदस्यांनी राजीनामे दिल्यानंतर सरपंच आजही आपली नैतिक जबाबदारी स्वीकारून पदावरून बाजूला होत नाहीत.ही मोठी शोकांतिका असून राजीनामा मंजूर झाल्यावर एक पदाधिकारी कारभार चालवीत असल्याचे भासवुन आहेत. सर्व सदस्यांनी अविश्वास दाखवल्यानंतरदेखील सरपंचपदाला चिकटून राहण्याचा प्रयत्न हा नेरळ गावातील ग्रामस्थांसाठी लाजीरवाणा प्रकार आहे. त्यात प्रशासनाने ५० टक्के हुन अधिक सदस्यांचे राजीनामे केल्याने आपोआप ग्रामपंचायत बरखास्त होते. मग सरपंचपददेखील रिक्त होत असते,मात्र प्रशासन का निर्णय घेत नाही याचे आश्चर्य आहे.
>
> – **मंगेश म्हसकर**, माजी उपसरपंच

या अहवालावर आपले पत्र जोडून कर्जत पंचायत समिती गटविकास अधिकारी यांनी अहवाल रायगड जिल्हा परिषदेकडे पाठवायचा असतो. गटविकास अधिकारी यांचा अहवाल ७ ऑगस्ट रोजी रायगड जिल्हा परिषदेकडे पोहचला आहे. त्यामुळे ग्रामपंचायत बरखास्त करण्याची कार्यवाही जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून होणार आहे.

राजीनामा देणारे सदस्य यांचा कालावधी साधारण २० दिवसांचा झाला असून आजपर्यंत नेरळ ग्रामपंचायत बरखास्त होण्याचा आदेश जिल्हा परिषदेने पारित करण्याची गरज होती. मात्र आजतागायत जिल्हा परिषदेकडून असे आदेश पारित झाले नसून ज्या जिल्हा परिषदेने याच नेरळ ग्रामपंचायतीच्या सदस्यांवर का कारवाई करू नये, यासाठी ९ जुलै रोजी पत्र पाठवली होती.

रायगड जिल्हा परिषद आता नेरळ ग्रामपंचायतीचा कारभार एकमेव सदस्य असलेल्या सरपंच यांच्याकडून करून घेताना दिसत आहे. रायगड जिल्हा परिषदेचे आशीर्वाद नेरळ ग्रामपंचायत सरपंच उषा पारधी यांना आहेत काय? असा सवाल नेरळ ग्रामस्थ विचारत आहेत.

आपले सर्व सदस्यांचे राजीनामे मंजूर झालेले असताना एकमेव सरपंच उषा पारधी कारभार हाकत असून त्यांना जिल्हा परिषद पाठिंबा देत आहे काय? असा सवाल देखील उपस्थित होत आहे. मात्र सदस्यांचे राजीनामे दिल्यानंतर मनमानीचे आरोप झाल्यावर नैतिक जबाबदारी म्हणून सरपंच उषा पारधी या राजीनामे देऊन मोकळ्या होतील असे वाटले होत. मात्र त्यांचे पद रिक्त होईपर्यंत त्या पदावर चिकटून बसल्या आहेत याचे आश्चर्य नेरळकरांना आहे.

## उरण तहसील कार्यालयावर
# न्यायासाठी धडकला मोर्चा



## उरणच्या समस्या मार्गी लावण्याची शिवसेनेची मागणी

**। उरण । वार्ताहर ।**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने उरण तालुक्यात सातत्याने उद्भवणाऱ्या वाहतूक कोंडी, खराब खड्डेमय रस्ते, ढासळलेली कायदा व्यवस्था,वाढते अपघात, सलाईनवरील आरोग्य यंत्रणा, महसूल आणि बीडीओ कार्यालयातील अनागोंदी कारभार यावर ठोस उपाययोजना करण्यासाठी शिवसेनेचे माजी आमदार तथा जिल्हाप्रमुख मनोहर भोईर यांच्या नेतृत्वाखाली गुरुवारी (दि.८) उरण तहसील कार्यालयावर धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

उरण तालुक्यातील जनतेला अनेक समस्यांनी वेढले आहे. त्यासमस्यांचे निराकरण करण्यासाठी शिवसेनेचे माजी आम दार तथा जिल्हाप्रमुख मनोहर भोईर, तालुकाप्रमुख संतोष ठाकूर यांनी अनेक वेळा संबंधित प्रशासनाच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन आपल्या मागणीतून उरण तालुक्यात सातत्याने उद्भवणाऱ्या वाहतूक कोंडी, खराब खड्डेमय रस्ते, वाढते अपघात, अनधिकृत पार्किंग,वाढती अंमली पदार्थांची विक्री, विजेची समस्या, ढासळलेली कायदा व्यवस्था, सलाईनवरील आरोग्य यंत्रणा, महसूल आणि बीडीओ कार्यालयातील अनागोंदी कारभार यावर ठोस उपाययोजना करावी तसेच शेती व मासेमारी करणाऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी केली होती.

परंतु संबंधित प्रशासनाने उपरोक्त जनहिताच्या प्रश्नांकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केल्याने शिवसेना उबाठा गटाच्या वतीने उरण तहसील कार्यालय याठिकाणी आपला निषेध व्यक्त करण्यासाठी व जनहिताच्या प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी धडक मोर्चाचे आयोजन केले होते.

यावेळी मनोहर भोईर यांनी उरण तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांच्या निदर्शनास उरणकरांच्या समस्यांचा पाढा वाचला व उरणची आमसभा पाच वर्षे का झाली नाही असा प्रश्न उपस्थित केला. तसेच शासनाच्या नियमांची अंमलबजावणी न करणाऱ्या संबंधित अधिकारी व अभियंता यांना निलंबित करण्याची मागणी करुन उरण शहरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्याची तसेच महिलांसाठी स्वच्छनागृह निर्माण करण्याची, सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची मागणी केली. अन्यथा चक्का जाम आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला.

सदर मार्चच्या वतीने शासनाचे प्रतिनिधी म्हणून उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांना निवेदन देण्यात आले. यावेळी गटविकास अधिकारी समिर वाठारकर, उप गटविकास अधिकारी डॉ. संतोष डाबेराव, पोलीस अधिकारी सुर्यकांत कांबळे, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल दहीफळे, वैद्यकीय अधिकारी डॉ बी. एम. काळेल, उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर, माजी जिल्हाप्रमुख दिनेश पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख संतोष ठाकूर, माजी सभापती विश्वास म्हात्रे, महिला आघाडीच्या भावना म्हात्रे, ज्योती सुरेश म्हात्रे, मनिषा ठाकूर, रंजना तांडेल, तालुका संघटक बी.एन.डाकी, दिपक भोईर, माजी नगराध्यक्ष गणेश शिंदे, शिवसेना तालुका उपसंघटक रुपेश पाटील, विद्यार्थी सेनेचे जिल्हा संघटक रोहिदास पाटील, कोप्रोलीचे माजी उपसरपंच नीरज पाटील, कोप्रोली शाखाप्रमुख रवी म्हात्रे, कोप्रोली माजी शाखाप्रमुख आकाश म्हात्रे, अशोक घरत, श्याम मोकाशी, नंदन म्हात्रे, महेश कोळी, संतोष कोळी, लक्ष्मण ठाकूर, राजेश भोईर, अमिताभ भगत, मंगेश थळी, नारायण तांडेल, नितेश पाटील, नयनेश भोईर, लवेश म्हात्रे आदी उपस्थित होते.

उरणच्या जनतेच्या निगडीत समस्यांचे निराकरण करण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न केले जातील तसेच तलाठ्याची नियुक्ती करण्यात येणार आहे. पाऊस कमी झाल्याने पूर परिस्थिती निर्माण झाली नाही. नुकसानग्रस्तांना भरपाई देण्यात येणार आहे. असे आश्वासन डॉ. उध्दव कदम यांनी दिले.

## अनधिकृत मच्छिमार्केटवर पालिकेची कारवाई

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल पालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक क मधील अनधिकृत ठरवण्यात आलेल्या मच्छी मार्केटवर पालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून गुरुवारी ( ता. ८) कारवाई करण्यात आली आहे. प्रभाग क्रमांक क मधील कामोठे वसाहतीतील सेक्टर १२ येथील मोकळ्या भूखंडावर हे मार्केट भरवण्यात येत होते. या कारवाई वेळी प्रभाग अधिकारी सदाशिव कवठे, कनिष्ठ अभियंता धनराज रजपूत, स्वच्छता निरीक्षक योगेश कस्तुरे, ऋषिकेश गायकवाड, अतुल वास्कर, अतिक्रमण पथक प्रमुख संतोष म्हात्रे, अतिक्रमण कर्मचारी, सफाई कर्मचारी आदी उपस्थित होते.

# कर्जतमध्ये काँग्रेसकडून मोर्चे बांधणी

- **उल्हासराव देशमुख उतरणार मैदानात**
- **उमेदवारीसाठी पक्षाकडे केला अर्ज दाखल**

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

कर्जत विधानसभा मतदार संघात आगामी विधानसभा निवडणुकीसाठी विद्यमान आमदार महेंद्र थोरवे, शिवसेनेचे नितीन सावंत, राष्ट्रवादी काँग्रेसचे सुधाकर घारे यांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. विशेषतः हे तीनही उमेदवार कर्जतमधील आहेत. अशात यावेळी खालापूर व खोपोलीला प्रतिनिधित्व मिळावे यासाठी काँग्रेसकडून जोरदार तयारी सुरू झाली आहे.

१९९५ मध्ये थोड्या मतांनी पराभूत झालेले काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेले उल्हासराव देशमुख यांनी काँग्रेसकडून उमेदवारी मागितली आहे. तशा प्रकारे रितसर उमेदवारी मागणीचा अर्ज त्यांनी सोमवारी प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांच्या व निवडणूक समितीकडे केला आहे.

उल्हासराव देशमुख यांना खोपोली शहर काँग्रेस, खालापूर तालुका काँग्रेस व कर्जत तालुका काँग्रेस कमिटीकडून सर्वानुमते सहमती दर्शविण्यात आली आहे. अत्यंत हुशार, कोणताही आरोप किंवा डाग नसलेला क्लिन चेहऱ्याचा उमेदवार म्हणून उल्हासराव देशमुख यांना महाविकास आघाडीकडून उमेदवारी मिळाल्यास अन्य राजकीय पक्षांकडूनही त्यांना मोठा पाठींबा मिळणार असल्याचे शहर अध्यक्ष रिचर्ड जॉन यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. आघाडीच्या संयुक्त बैठकीत उल्हासराव देशमुख यांच्या उमेदवारीबाबत चर्चा करण्यात येईल व प्रदेश काँग्रेसकडून पूर्ण ताकदीने कर्जत मतदार संघ काँग्रेससाठी मागण्यात येईल असे आश्वासन प्रदेश अध्यक्ष यांनी दिले असल्याचे काँग्रेस नेत्यांनी सांगितले.

सोमवारी खोपोली काँग्रेसचे ज्येष्ठ नेते उल्हासराव देशमुख यांना १८९ कर्जत - खालापूर विधानसभेची उमेदवारी मिळावी यासाठी उमेदवारी अर्ज टिळक भवन येथील प्रदेश कार्यालयात सुपूर्द करण्यात आला आहे. या वेळेस रिचर्ड जॉन(अध्यक्ष खोपोली शहर काँग्रेस), ई.बी.मुलानी (प्रदेश प्रतिनिधी), सागर जाधव, अबु अली खोत (उपाध्यक्ष रायगड जिल्हा), हैदर अली फक्की (उपाध्यक्ष अल्पसंख्याक सेल रायगड), जमाल भाई सोरटिया (सल्लागार खोपोली काँग्रेस),तय्यब शेख (अध्यक्ष युवक काँग्रेस खोपोली), मुक्तार शेख (अध्यक्ष पर्यावरण सेल खोपली) यांच्यासह रेखा जाधव महिला अध्यक्ष खोपोली व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

## वाहतूक सुरक्षा हा सुरक्षित जीवनाचा मार्ग

**। उरण । वार्ताहर ।**

वाहतूक सुरक्षेबाबत आपल्याकडे चांगले नियम आहेत; पण ते पाळले जात नाहीत हेच दुर्दैव आहे. वाहतूक सुरक्षा हा सुरक्षित जीवनाचा मार्ग आहे, त्यामुळे अशा घटना रोखण्यासाठी आता सर्वांनी आपली जबाबदारी ओळखण्याची गरज आहे, असे मत न्हावा शेवा वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जी.एम.मुजावर यांनी व्यक्त केले.

**जी.एम.मुजावर वरिष्ठ पोलीस निरीक्षक**



उरण तालुक्यातील रयत शिक्षण संस्थेचे तुकाराम वाजेकर विद्यालय, फुंडे गाव येथील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना न्हावा शेवा वाहतूक शाखेच्या वतीने रस्ता सुरक्षा व वाहतुकीचे नियम या दृष्टीने मार्गदर्शनपर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी लहान मुलांनी कोणत्याही परिस्थितीत विनापरवाना वाहन न चालवण्याच्या अनुषंगाने तसेच त्यांनी स्वतः व त्यांचे पालकांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विनापरवाना वाहन चालवणे, वाहन चालवताना मोबाईलवर न बोलणे, सिग्नल नियमांचे पालन करणे, रस्ता ओलांडताना योग्य खबरदारी घेणे, स्कूल बस व रिक्षामधून प्रवास करताना योग्य ती दक्षता घेणे, रस्त्यावरील सूचना फलकावरील सूचनांचे पालन करावे याबाबत न्हावा शेवा वाहतूक शाखेच्या वतीने मार्गदर्शन करण्यात आले.

सदर कार्यक्रमास न्हावा शेवा वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जी.एम. मुजावर, पोलीस अंमलदार मेटे, पोलीस अंमलदार ठोके,प्राचार्य एम.जी. म्हात्रे, शिक्षक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.

## महिला सुरक्षा व सायबर क्राईम मार्गदर्शन

**। नागोठणे । वार्ताहर ।**

कोएसोच्या नागोठण्यातील बापूसाहेब देशपांडे विद्या संकुलातील आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालयात नागोठणे पोलीस ठाण्याच्या सहकार्याने महिला सुरक्षा व सायबर क्राईम या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून सापोनि सचिन कुलकर्णी हे उपस्थित होते.



सचिन कुलकर्णी यांनी विद्यार्थीनींना नेहमी सावध राहाण्याचे आव्हान केले. अनोळखी व्यक्तींबरोबर मोबाईलवर व सोशल मीडियावर काहीही शेअर करू नये. बाईकवर कोणी लिफ्ट देत असेल तर स्पष्टपणे नकार द्यावा. तसेच कोणावरही पटकन विश्वास ठेवू नये व खायला दिलेली बिस्किट व चॉकलेट घेऊ नये. सायबर फसवणूक टाळण्यासाठी आपला ईमेल आयडी, मोबाईल क्रमांक कोणालाही शेअर करू नये. तसेच सार्वजनिक ठिकाणी ऑनलाईन व्यवहार करू नये.

या प्रसंगी विनोद पाटील यांनी मुलींना मदत करण्यासाठी आम्ही सदैव तयार आहोत. आपण कोणताही अनुचित प्रकार घडला तर प्रथम आईवडिलांना सांगितले पाहिजे. हे शिक्षकांना सांगावे व नंतर आमच्याकडे तक्रार नोंदवली पाहिजे. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. दिनेश भगत यांनी महिलांना नेहमी राम किंवा कृष्ण संरक्षण करण्यासाठी येणार नाहीत. यासाठी आपणच खंबीर होणे ही काळाची गरज आहे. महिला विभाग प्रमुख डॉ. स्मिता चौधरी यांनी महिला कक्षामार्फत विद्यार्थीनिंना दिल्या जाणाऱ्या सुविधा विषयी माहिती सांगितली.

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. श्रीकृष्ण तुपारे यांनी कार्यक्राचे प्रास्ताविक केले. त्यांनी महाविद्यालयातर्फे राबविण्यात येणारे उपक्रम या विषयी उपस्थितांना माहिती दिली. या कार्यक्रमात निबंध स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मनोहर शिरसाठ यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. राणी ठाकरे यांनी केले. या कार्यक्रमास माजी प्राचार्य डॉ. संदेश गुरव, प्रा. डॉ. विजय चव्हाण, सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## शैक्षणिक साहित्य वाटप

**। पाताळगंगा । वार्ताहर ।**

सिप्ला फाउंडेशनच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी आर्थिक तसेच शैक्षणिक साहित्याचे वाटप माजगाव शाळेमध्ये करण्यात आले. माजगाव शाळेमध्ये यावर्षी दहावीमध्ये उत्तम गुण संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना आर्थिक स्वरूपात बक्षिसे देण्यात आली. यामध्ये प्रथम क्रमांक १२ हजार रुपये, द्वितीय १० हजार रुपये तसेच तृतीय ८ हजार रुपयांचे बक्षीस विद्यार्थ्यांना देण्यात आले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी आपण हे बक्षीस जिंकल्यामुळे त्यांच्या चेहऱ्यांवर आनंदाचे हास्य झळकत असल्याचे पाहावयास मिळाले.

## रस्ता, नदी आणि समुद्रावरही सेवा मिळणार
# 108 रुग्णवाहिका सेवेला बळकटी

**। रायगड । प्रतिनिधी ।**

मोफत रुग्णवाहिका सेवा ‘१०८’ आणखी मजबूत होणार आहे. ही सेवा देण्यासाठी राज्य सरकारने नवीन कंपनीची निवड केली आहे. जनतेसाठी रुग्णवाहिकांची संख्या पूर्वीपेक्षा जवळपास दुप्पट होणार आहे.

आपत्कालीन परिस्थितीत आणि रस्ते, रेल्वे अपघात आणि इतर अनुचित घटनांमध्ये रुग्णांना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यासाठी ‘१०८’ रुग्णवाहिका शासनाकडून चालवली जाते. १०८ क्रमांकावर कॉल करताच रुग्णवाहिका तातडीने रुग्णाला रुग्णालयात पोहोचवते.

### हेलिकॉप्टर आणि ड्रोन सेवेवर लक्ष

**आरोग्य विभागाशी संबंधित सूत्रांनी सांगितले की, सरकार लवकरच एअर ॲम्बुलन्स (हेलिकॉप्टर) आणि ड्रोनचा वापर करण्याचा विचार करत आहे. यासोबतच, रुग्णाला रुग्णालयात पोहोचण्यापूर्वी रुग्णालयांना माहिती दिली जाईल, जेणेकरून ते रुग्णाला तत्काळ उपचार देण्यासाठी तयार होतील, अशी यंत्रणा तयार करण्याचीही योजना आहे.**

**संख्या 937 वरून 1756 पर्यंत वाढणार**




सरकारने यासाठी कंपनी नेमली होती. कंपनीसोबतचा करार काही महिन्यांपूर्वी संपला होता, त्यानंतर सरकार नवीन पुरवठादाराच्या शोधात होते.

सरकारने ही सेवा देण्यासाठी सुमीत फॅसिलिटीज लिमिटेड आणि ग्रुप्स एसएसजी मॅट्रिक्स, स्पेन यांची निवड केली आहे. आता महाराष्ट्रात आपत्कालीन वैद्यकीय सेवा पुरविण्याची जबाबदारी कंपनीवर सोपवण्यात आली आहे.

आतापर्यंत ९३७ रुग्णवाहिका सेवा देत होत्या, मात्र आता रुग्णवाहिकांची संख्या १७५६ होणार आहे. सुमीत ग्रुप एंटरप्रायझेसचे सुमीत साळुंखे म्हणाले की, सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. या उपक्रमाचा रुग्ण सेवेवर दूरगामी प्रभाव पडेल.

१७५६ विशेष रुग्णवाहिकांपैकी यामध्ये १२७३ मूलभूत जीवन सपोर्ट, २५५ प्रगत जीवन सपोर्ट, ३६ नवजात रुग्णवाहिका, १६६ बाईक रुग्णवाहिका, १० समुद्री बोट आणि १५ नदी बोट रुग्णवाहिका यांचा समावेश आहे. या सर्व रुग्णवाहिका आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असतील. सरकार त्याच्या ऑपरेशन खर्चावर अंदाजे ४२५ कोटी ते ८०० कोटी रुपये खर्च करणार आहे.

## तालुक्यातील शेतीच्या प्रमाणात घट

**। पनवेल । वार्ताहर ।**

**6021.28 हेक्टर क्षेत्रात भातलागवड**

### १३२ हेक्टर क्षेत्रावर फळ, भाजीपाला

**पनवेल तालुक्यात ६,२०१.५३ हेक्टरवर शेती केली जाते. यामध्ये यंदा ६,०२१.२८ हेक्टरवर भातपेरणी करण्यात आली आहे. मागील वर्षीच्या तुलनेत हे प्रमाण कमी झाले आहे. तसेच यंदा १३२.५८ हेक्टरवर फळ व भाजीपाला लागवड केली गेली आहे. ६१.२८ हेक्टर क्षेत्रावर नागली पीक घेतले जात आहे. मागील वर्षीच्या तुलनेत या वर्षी भातपिकाचे क्षेत्र कमी झाल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी शरद गीते यांनी दिली.**

एके काळी भाताचे कोठार म्हणून ओळख असलेल्या पनवेल तालुक्यातील शेतीच्या लागवडीत घट झाली आहे.यंदा केवळ ६०२१.२८ हेक्टर क्षेत्रात भातलागवड करण्यात आली असून, २०२३मध्ये सात हजार हेक्टरच्या आसपास लागवड करण्यात आली होती; त्यामुळे मागील वर्षपेक्षा यंदा पीकपेरा कमी झाला आहे.

गेल्या काही वर्षांपासून अवकाळी तसेच अतिवृष्टीमुळे पिकांची हानी झाली होती; परंतु यंदा समाधानकारक पाऊस झाला आहे. भात हे पनवेलच्या ग्रामीण पट्ट्यातील महत्त्वाचे पीक आहे. सुरुवातीपासूनच समाधानकारक पाऊस झाल्याने जूनच्या दुसऱ्या आठवड्यात भातपेरणीला सुरुवात झाली व जुलैअखेर बहुतांश पूर्ण झाल्या आहेत. पनवेल तालुका हे भाताचे कोठार समजले जात होते. या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर भातशेती केली जात असे; परंतु औद्योगिकीकरण व शहरीकरण पनवेलच्या ग्रामीण भागाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपले असल्याने या ठिकाणचे शेती क्षेत्र कमी झाले आहे.तळोजासारखी औद्योगिक वसाहत, पनवेलच्या पूर्व भागात आलेले मोठमोठे गृहप्रकल्प व फार्म हाऊस संस्कृतीमुळे शेती क्षेत्र कमी झाले आहे.

# दादा, तुमची बस चुकली

सत्व आणि तत्व गुंडाळून ठेवून कदाचित थोडीफार सत्ता मिळू शकते. पण त्यामुळे तडफड थांबण्याऐवजी आणखीनच वाढते. या विधानाचे मराठी प्रांतातले साक्षात उदाहरण म्हणजे अजित पवार आहेत. 'मुख्यमंत्री व्हायचंय मला', हा अजितदादांचा शो कित्येक वर्षांपासून महाराष्ट्रात चालू आहे. हा शो भरपूर गर्दी खेचतो. पण दादांची इच्छा काही पूर्ण होत नाही. त्यांचे कार्यकर्ते ठिकठिकाणी भावी मुख्यमंत्री म्हणून दादांचे होर्डिंग लावतात. परवा त्यांच्या वाढदिवसाला मुख्यमंत्री अजितदादा असा केक कापण्यात आला. फार काय, दादांच्या मातोश्रींनीही त्यांना लवकर मुख्यमंत्री झालेले पाहायचे आहे असे पूर्वी एकदा म्हटले होते. बऱ्याच वर्षांपासून त्यांचे हे स्वप्न आहे आणि आपले आता वय झाले आहे अशी मिस्किल पुस्तीही त्यांनी जोडली होती. दादांच्या बहुतेक सहकाऱ्यांचे त्यांच्यावर प्रेम आहे व तेही सर्व जण दादांना आम्हाला मुख्यमंत्री झालेले पाहायचे आहे असे म्हणतात. अर्थात, त्यातही छगन भुजबळ यांच्यासारखे काही अपवाद आहेतच. आपण सर्वांमध्ये ज्येष्ठ आहोत याची आठवण भुजबळ करून देत असतात. पवारांनी फुटून राष्ट्रवादी स्थापन केली तेव्हा आपण काँग्रेसमध्येच मागे थांबलो असतो तर आपल्याला मुख्यमंत्रिपदाची ऑफर होती असेही त्यांनी एकदा सांगितलेले आहे. त्यामुळे दादांसारखाच त्यांचाही शो अधूनमधून चालतो. पण त्याला गर्दी होत नाही. खुद्द दादांनी अलिकडे अनेकदा जाहीरपणे आपले पद किती वेळा व कसे हुकले याची उजळणी केली आहे. २००४ मध्ये राष्ट्रवादीच्या काँग्रेसपेक्षाही अधिक जागा असूनही शरद पवारांनी आपल्याला मुख्यमंत्री होऊ दिले नाही असे ते म्हणतात. त्यांच्या दाव्यामध्ये हवा भरण्यासाठी प्रफुल्ल पटेल वगैरे मंडळी आजूबाजूला असतातच. परवा पुन्हा ठाण्यामध्ये दादांच्या मनातली खदखद बाहेर आली. एकनाथ शिंदे चाळीस आमदार घेऊन आले आणि मुख्यमंत्री झाले, भाजपने आपल्याला आधीच ही ऑफर दिली असती तर आपण आख्खा पक्षच घेऊन आलो असतो असे दादा म्हणाले.

### पराभव मान्य

शिंदे आणि फडणवीस यांच्यापेक्षा आपण दहा वर्षे आधी आमदार झालो, पण ते दोघेही आपल्या पुढे निघून गेले अशी जाहीर खंतही त्यांनी बोलून दाखवली. कार्यक्रम एकनाथ शिंदे यांच्यावरच्या पुस्तकाच्या प्रकाशनाचा होता. त्याला झाडून सर्व नेते हजर होते व एकमेकांना कोपरखळ्या हाणत होते. दादाही त्याच ओघात विनोदाने म्हणून बोलले. पण त्यामागचे दुःख लपणारे नव्हते. राजकारणात असली दुःखे जाहीरपणे बोलली जात नसतात. कारण तसे करणे म्हणजे पराभव मान्य करणे असते. दादा फार मानी राजकारणी आहेत. ते असा पराभव कधी मान्य करतील असे कोणाला वाटले नसते. पण ते घडते आहे. एकदा नव्हे तर सातत्याने पोटातले ओठावर येत आहे. याचे कारण आपली बस चुकली आहे हे त्यांना कळून चुकले आहे. आता पुन्हा ही संधी मिळण्याची शक्यता नजीकच्या काळात नाही. गेल्या पाच वर्षांत दादांनी टाकलेले प्रत्येक पाऊल त्यांना अधिकाधिक गोत्यात घेऊन गेले आहे. पहिल्यांदा महाविकास आघाडी स्थापन होताना त्यांनी घायकुतेपणा केला. शिवसेनेसोबत जायची त्यांची इच्छा नव्हती. म्हणून पहाटेचा शपथविधी केला. पण तेव्हा कोणीही आमदार त्यांच्यासोबत आले नाहीत. त्यांना परत आघाडीत जावे लागले. त्यांचे नशीब चांगले की, शरद पवार यांचे ते पुतणे होते. त्यामुळे त्यांची चूक सांभाळून घेतली गेली. तिथे त्यांना उपमुख्यमंत्रिपद मिळाले. शिंद्यांचे बंड आणि त्यांना मिळालेली सत्ता पाहून त्यांनी पुन्हा उचल खाल्ली. यावेळी त्यांच्यासोबत चाळीस आमदार आले. सतत सत्तेच्या सोबत राहण्याची त्यांना इतकी सवय झाली आहे की, सत्ता नसेल तर ते बेचैन होतात. आज त्यांचा जो विकास, विकास असा जप चालू आहे तो प्रत्यक्षात सत्ता, सत्ता असा आहे.

### चुकली नाही, चुकवली

पण मुळात मोदी व शाह यांच्या राक्षसी भाजपसोबत जायला बहुसंख्य मराठी जनता मनाने तयार नाही हे दादांच्या लक्षात आले नाही. दादांनी या जनतेचे पुढारपण करणे अपेक्षित होते. त्यांचे काका आज वयाच्या ८४व्या वर्षी ते करीत आहेत. मधल्या काळात काकांनी डावपेच केले असतील. पण मोदींचे राजकारण देशाला घातक आहे अशी स्पष्ट भूमिका त्यांनी घेतली. त्यासाठी किंमत चुकवण्याची तयारी ठेवली. नेमके तेच दादांना नको होते. जनतेत जाऊन लढण्याची, त्यांच्यासाठी मोर्चे काढण्याची व संघटना बांधण्याची धमक व इच्छाशक्ती दादांमध्ये नाही. कंत्राटदारी पद्धतीने कामे व पैसा वाटला की कार्यकर्ते व लोकांची मते आपल्यासोबत राहतात असा त्यांचा समज आहे. पण असलाच हिशेब करून दुसरा कोणीतरी बाजी मारू शकतो हे त्यांच्या लक्षात आले नाही. एकनाथ शिंदेंनी इथेच बाजी मारली. नशीब आणि वेळ यांनी त्यांना साथ दिली. त्यामुळे दादांची तगमग होते आहे. त्यातच लोकसभेला दणकून पराभव झाला. आमदारांसोबत राष्ट्रवादीची मतेही आपल्याकडे येतील हा हिशेब साफ चुकला. त्याबाबत दादांनी खरे तर चिंतन करायला हवे होते. पण पैसे व योजना फेकून लोकांची मते विकत घेता येतात हा त्यांचा समज कायम आहे. बहीण माझी लाडकी टाईपच्या योजनांचा गवगवा ते करीत आहेत. त्यातच भाजपच्या नादाने ते पीआर एजन्सीज, सोशल मिडियातली प्रसिध्दी यांच्याकडे वळले आहेत. गुलाबी जाकिटे घालू लागले आहेत. पण एकीकडे भाजपसोबत गेल्याने आपण मुस्लिम, दलित आणि सर्वजातीय विचारी मतदार गमावला आहे हे त्यांच्या लक्षात येत नाही. शिवसेना हा भाजपचा हिंदुत्व मतांमधला मोठा वाटेकरी होता. त्यामुळे सेनेला फोडणाऱ्या शिंदे यांचे महत्व भाजपसाठी वेगळे आहे. त्यासाठीच त्यांना मुख्यमंत्रिपद दिले गेले व पुढेही दिले जाऊ शकेल. दुसरीकडे बहुसंख्य जनतेला दादांचा भरवसा वाटत नाही. ते अजूनही काकांच्या व आघाडीच्या मागे आहेत. दादा, तुमची बस चुकलेली नाही, तुम्हीच ती चुकवलेली आहे.

विचार

# न्यायालयाचा निवाडा, प्रशासनाला धडा

***पदाचा आणि पैशाचा माज कधी तरी उतरतोच. त्याला वेळ लागतो, इतकेच. व्यवस्थेतील त्रुटींचा गैरफायदा घेत, सगळे नियम धाब्यावर बसवत पूजा खेडकर सनदी अधिकारी झाली; परंतु खुर्ची आणि ऐषारामी मागण्यांनी तिला आजच्या टप्प्यावर आणून सोडले. या प्रकरणी न्यायालयाने दिलेल्या निर्णयानंतर अनेक प्रशासकीय त्रुटी समोर आल्या. अशा त्रुटी पुन्हा आढळू नयेत यासाठी सजग होण्याचे आव्हान आता यंत्रणेपुढे आहे.***

**राही भिडे**

सत्तेचा आणि पैशाचा माज केला, पदाच्या जोरावर संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेला वाकवू शकतो, असा अहंकार आला की मग फजिती आलीच. त्यातही ज्या घरात पहिल्या दोन पिढ्या प्रशासनात वावरल्या आहेत, तिथे प्रशासनातील 'लूप होल्स' जसे माहीत असतात तसेच प्रशासनाच्या विरोधात गेल्यास कितीही मोठा माणूस असला तरी प्रशासन कसे सरळ करते, हे माहीत असायला हवे. एखाद्याने फसवायचे ठरवले असेल तर तो संपूर्ण व्यवस्थेला फसवू शकतो, सगळ्यांनाच कसे खुळ्यात काढू शकतो, हे पूजा खेडकर प्रकरणामुळे स्पष्ट झाले. एखाद्या सराईत गुन्हेगाराला लाजवेल, अशा पद्धतीने पूजाने कायद्याची आणि संपूर्ण व्यवस्थेची फसवणूक केली. व्यवस्थेतल्या त्रुटींचा गैरफायदा घेत, सगळे नियम धाब्यावर बसवत सनदी अधिकारी झाली; परंतु खुर्ची आणि ऐषारामी मागण्यांनीच तिला या टप्प्यावर आणून सोडले. खोट्याच्या पायावर बांधलेली इमारत फार काळ टिकत नाही, हे जगन्मान्य सत्य आता तिलाही अनुभवायला मिळाले. एक सत्य लपवायला गेले की अनेकदा असत्याचाच आधार घ्यावा लागतो आणि असे असत्य मग कधी ना कधी अंगलट येते. वास्तविक, घरात पन्नास कोटी रुपयांहून अधिक संपत्ती, बेनामी मालमत्ता, वेगवेगळ्या कंपन्या, पैशाच्या जोरावर मिळवलेली वैद्यकीय शाखेची पदवी असताना प्रशासकीय सेवेचा अट्टाहास कशासाठी, असा प्रश्न पडतो. जिद्द, ध्येय आणि प्रयत्नांची पराकाष्ठा करायची तयारी असेल, तर केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा देण्याचा निर्णयही समजू शकतो; परंतु यापैकी काहीच नसताना छानछौकी, मिजास आणि पैशाचा माज कशासाठी करायचा, असा प्रश्न पडतो. या निमित्ताने इतरही अनेक प्रश्न समोर आले आहेत. त्यांचा वेध घ्यायला हवा.

या प्रकरणाच्या निमित्ताने यंत्रणेने काही मुद्द्यांचा साकल्याने विचार करायला हवा. केंद्रीय लोकसेवा आयोगाने ओबीसी समाजासाठी ठरवून दिलेली परीक्षा देण्याच्या प्रयत्नांची मर्यादा संपल्यानंतर तरी पूजा खेडकरने हा मार्ग सोडून द्यायचा, तर ते ही झाले नाही. एवढे कांड, चमकोगिरी आणि एकामागून एक कारनामे बाहेर आल्यानंतर थेट पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांवर लैंगिक छळाचा आरोप करणे हा तर आणखी एक कावा. आरोप करायचा आणि पोलिसांनी चौकशीला बोलावले तर यायचेच नाही, याला काय म्हणायचे? आई-वडीलांनी पूजाला वेळीच रोखले असते, तर आज देशात पूजाच्या नावे जो काळाकुट्ट इतिहास लिहिला गेला, तो लिहिला गेला नसता. पूजाचे आजोबा, तिचे वडील आणि आईचे वर्तन पोर्शे कार प्रकरणातील अग्रवाल कुटुंबासारखे आहे. चूक दिसत असताना पूजाला परावृत्त करण्याऐवजी फूस दिली, तर चांगल्या वर्तनाची अपेक्षाच करता येत नाही. गेल्या महिन्याभरात पूजा आणि तिच्या कुटुंबीयांचे वेगवेगळे कारनामे पाहून महाराष्ट्रातल्या जनतेवर थक्क होण्याची वेळ आली. केंद्रीय लोकसेवा आयोगाने तिचे सनदी अधिकारीपद काढून घेतले आणि यापुढे परीक्षा देण्यास कायमस्वरुपी बंदी घातली. पंतप्रधान कार्यालयाने या प्रकरणात दखल घेतली, तेव्हाच पूजा आणि तिच्या कुटुंबीयांना यातले गांभीर्य उमगायला हवे होते. केंद्रीय लोकसेवा आयोगाने एखाद्याचे आयएएस पद काढून घेणे हे दुर्मिळातील दुर्मिळ उदाहरण आहे.

हे प्रकरण चर्चेत आल्यानंतर केंद्रीय लोकसेवा आयोगाने गेल्या १५ वर्षांमधील सर्व दिव्यांग प्रमाणपत्रांची छाननी केली. त्यात १४ हजार ९९९ उमेदवारांची प्रमाणपत्रे योग्य ठरली पण एकट्या पूजाचे प्रमाणपत्र बनावट निघाले. यावरून पूजाने जिल्हाधिकारी होण्यासाठी केंद्रीय लोकसेवा आयोगालाही गंडवल्याचे सिध्द झाले. स्वतःचे नाव तर बदलण्यावर तिचे समाधान झाले नाही. आई-वडिलांच्या नावाच्या स्पेलिंगमध्येही बदल करून फसवणूक केली. त्यामुळेच पूजाने नेमकी किती वेळा परीक्षा दिली, हे केंद्रीय लोकसेवा आयोगालाही समजले नाही. नाव बदलून तिने अनेक वेळा परीक्षा दिली. नऊ वेळा ओबीसी वर्गातून केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा देऊन प्रयत्नाची मुदत संपल्यानंतरही तिने दिव्यांग प्रवर्गातून दोन वेळा परीक्षा दिल्या. एक चांगले झाले की पूजा प्रकरणाचा बोध घेऊन केंद्रीय लोकसेवा आयोग आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने आता अधिक पारदर्शकता दाखवत नियम कडक करण्याबरोबरच अशा संशयास्पद प्रकरणांची चौकशी करण्याचा निर्णय घेतला. दर वर्षी हजारो, लाखो उमेदवार केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा देतात.

त्यात ओबीसी आणि दिव्यांगांचा समावेश असतो. त्यासाठीचे प्रमाणपत्र सक्षम अधिकाऱ्याने दिले आहे की नाही, त्यावरची तारीख, प्रमाणपत्रावर काही ओव्हररायटिंग आहे की नाही याची प्राथमिक छाननी केली जाते; परंतु ही सर्व प्रमाणपत्रे खरी आहेत की नाही याची सत्यता तपासण्याचे साधन किंवा व्यवस्था केंद्रीय लोकसेवा आयोगाकडे नाही, असे दिसते. पूजाने संपूर्ण व्यवस्थेसोबत 'फ्रॉड' केला असून एका प्रामाणिक उमेदवाराची संधी हिरावून घेतली. व्यवस्था बदलायची असेल तर आधी व्यवस्थेचा भाग व्हावे लागते, असा विचार करून अनेक तरुण दिवसरात्र अभ्यास करतात. परिस्थितीशी दोन हात करून स्वतःला सिद्ध करण्यासाठी रक्ताचे पाणी करतात. अशा तरुणांच्या दुर्दम्य आशावादाला पूजाच्या करतुतींनी धक्का दिला आहे. पूजावरची ही कारवाई एकतर्फी आहे, असेही म्हणता येत नाही. केंद्रीय लोकसेवा आयोगाने तिला म्हणणे मांडण्यासाठी पुरेशी संधी दिली होती. मुदतवाढही दिली होती. दिल्ली पोलिसांनी याधीच पूजावर खोटे प्रमाणपत्र दिल्याचा आरोप ठेवत गुन्हा दाखल केला आहे. पूजाला लाल दिव्याचा सोस नडला.

ऑडी कारवर महाराष्ट्र सरकारचे स्टिकर्स लावून फिरणे, अधिकाऱ्यांना धमकावणे, वरिष्ठ अधिकाऱ्याच्या चेंबरवर कब्जा करणे आदी कुरघोड्यांमुळे तिचे पुढचे कारनामे उघड झाले. या पार्श्वभूमीवर केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या विश्वासार्हतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. 'यूपीएससी'ने शिफारस केलेल्या उमेदवारांच्या नियुक्तीमध्ये केंद्रीय कार्मिक मंत्रालयाची भूमिका काय असते, 'यूपीएससी'ने आणि त्यानंतर 'कॅट'ने शिफारस नाकारूनही पूजाची नियुक्ती कशी करण्यात आली, पूजाने खासगी डॉक्टरकडून मिळवलेले खोटे प्रमाणपत्र कुणी ग्राह्य धरले, खासगी किंवा इतर ठिकाणाहून अपंगत्वाचा दाखला देणारे किती उमेदवार आज सेवेत रुजू आहेत अशा अनेक अनुरीत प्रश्नांच्या मुळाशी गेले, तरच पूजा खेडकर प्रकरणाच्या निमित्ताने लागलेली कीड दूर करता येईल.

'यूपीएससी' देशातील सर्वोच्च पदासाठी राबवत असलेली निवड प्रक्रिया खरोखरच सर्वोत्तम आहे का, तसे नसेल तर पूजासारखे चमकोगिरी करणारे आणि खोटे दाखले देऊन उत्तीर्ण होणारे उमेदवार 'आयएएस' कसे होतात असे प्रश्नही या निमित्ताने उपस्थित होतात. या प्रश्नांचे उत्तर पटकन यशस्वी होण्यासाठी तीव्र दबाव किंवा उच्च दर्जा प्राप्त करण्यासाठी शॉर्टकट अवलंबण्याच्या वृत्तीमध्ये असू शकते.

तथापि, अशा निवडीमुळे अनेकदा गंभीर परिणाम होतात. पूजाची सार्वजनिक सेवा क्षेत्रातील कारकीर्द, प्रतिष्ठा आणि भविष्यातील संभाव्यता नष्ट होणे हे प्रामाणिकपणा आणि नैतिक वर्तनाच्या महत्त्वाची आठवण करून देते. पूजा प्रकरणानंतर आता दिव्यांग व्यक्तींचे हक्क कायदा २०१६ मध्ये सुधारणा करण्यासाठी केंद्र सरकारने मसुदा प्रकाशित केला. त्याअंतर्गत आता ही प्रक्रिया लांबली आहे. सुधारणांचा मसुदा तयार करताना या वादाचा विचार करण्यात आला आहे. यामुळे आता दिव्यांग प्रमाणपत्र देण्याबाबत कडक नियम होणार आहेत. सुधारित नियमांनुसार, अपंगांना त्यांच्या ओळखीचा पुरावा, सहा महिन्यांपेक्षा जुना फोटो आणि आधार कार्ड सादर करणे बंधनकारक आहे. अपंगत्व प्रमाणपत्रासाठी अर्ज प्राप्त करण्यासाठी आणि प्रक्रिया सुरू करण्यासाठी फक्त वैद्यकीय अधिकारी सक्षम मानले जातील. यासाठी लागणारा कालावधी एक ते तीन महिन्यांपर्यंत वाढवावा, असेही सांगण्यात आले आहे.

गेल्या वर्षी, सरकारने पहिल्यांदा सर्व दिव्यांगांना लाभ घेण्यासाठी 'यूडीआयडी' कार्ड असणे अनिवार्य केले होते. 'यूडीआयडी' कार्डसाठी आधार अनिवार्य करण्यात आले. सरकारने दिव्यांगांसाठी कलर-कोडेड 'यूडीआयडी' कार्ड प्रस्तावित केले आहेत. ४० टक्क्यांपेक्षा कमी अपंगत्व असलेल्या लोकांसाठी पांढरे कार्ड, ४० ते ८० टक्क्यांदरम्यान अपंगत्व असलेल्या लोकांना पिवळे कार्ड आणि ८० टक्क्यांपेक्षा जास्त अपंगत्व असलेल्यांना निळे कार्ड सुचवण्यात आले आहे.

दोन वर्षांहून अधिक काळ अर्जावर निर्णय घेण्यास संबंधित वैद्यकीय अधिकारी असमर्थ ठरल्यास अर्ज रद्द केला जाऊ शकतो. ते पुन्हा सक्रिय करण्यासाठी, प्राधिकरणाशी संपर्क साधावा लागेल. असे बदल यापुढील काळात कितपत सार्थकी लागतात, हे पाहणे गरजेचे आहे.

आजकाल

# केशवराव नाट्यगृहाला आग- लागली की लावली?

केशवराव भोसले नाट्यगृह ऊर्फ पॅलेस थिएटरला लागलेल्या आगीवरुन चर्चेच्या ज्वाळा उठू लागल्या आहेत. ही आग प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे, निकृष्ट दर्जाच्या कामामुळे लागली असल्याचा आरोप करून आगीची संपूर्ण चौकशी झाली पाहिजे. त्यामध्ये अनावश्यक बदल करणाऱ्यांना शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी कोल्हापूर शहर व जिल्हा नागरिक कृती समितीने केली आहे.

त्यांनी पत्रकात नमूद केले आहे की, १९१२ साली छत्रपती शाहू महाराजांनी बांधलेल्या पॅलेस थिएटर तथा केशवराव भोसले नाट्यगृह आणि खासबाग कुस्ती मैदान साकारले. आज नाट्यगृहाला लागलेल्या आगीत संपूर्ण लाकडी साहित्याने उभारलेले व्यासपीठ प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे शॉर्ट सर्किटमुळे जळून नष्ट झाले आहे. शाहू महाराजांच्या वास्तूचे नूतनीकरण करण्यासाठी आणलेला कोट्यावधी रुपयांचा निधी वाया गेला आहे. यामध्ये लोकप्रतिनिधी आणि प्रशासनांना टक्केवारीतून लचके तोडण्याची लागलेली सवय आणि निष्काळजीपणाची कामे याचे हे गंभीर दुष्परिणाम आहेत.

आज नऊ ऑगस्ट रोजी संगीतसूर्य केशवराव भोसले यांची जयंती आहे.या जयंतीच्या निमित्ताने संगीत सूर्य केशवराव भोसले नाट्यगृहामध्ये दोन दिवस भरगच्च कार्यक्रम ही आयोजित केले होते.याच कार्यक्रमांमध्ये आम्ही संगीतसूर्य केशवरावांचे जीवन चरित्र सांगणाऱ्या दुर्मिळ छायाचित्रांचे प्रदर्शन हे या नाट्यगृहाच्या बाबुराव पेंढारकर सभागृहामध्ये कालच रात्री लावलेले होते.पण दुर्दैवानं आज साधारण साडेआठ नऊच्या दरम्यान ऐतिहासिक वारसा असणाऱ्या या नाट्यगृहाला आग लागली आणि नाट्यगृह जळून भस्मसात झाले. राजर्षी शाहू छत्रपतीनी १९०२ मध्ये विदेश दौरा केला होता. या विदेश दौऱ्यामध्ये त्या ठिकाणी असणारी भव्य नाट्यगृह महाराजांनी पाहिली, अशाच पद्धतीचे नाट्यगृह आपल्या राज्यातही असलं पाहिजे, आणि या नाट्यगृहांमध्ये आपल्या मातीतील कलाकारांनी त्यांची नाटके सादर केली पाहिजेत.इथल्या लोकांना ती बघता आली पाहिजेत.म्हणून शाहू महाराजांनी कोल्हापुरात खासबाग म्हणून ओळखल्या जाणारे ठिकाणी एका भव्य नाट्यगृहाची उभारणी केली. हे नाट्यगृह १९१५ मध्येच बांधून पूर्ण झाले. आणि या नाट्यगृहाला महाराजांनी नाव दिले ''पॅलेस थेटर'' पुढे ज्यावेळी भारत स्वतंत्र झाला आणि महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली त्यानंतर या नाट्यगृहाचे नामकरण संगीत सूर्य केशवराव भोसले यांच्या नावाने झाले.

भारतामध्ये अशी खूप कमी नाट्यगृह आहेत, की ज्यांना शतकाचा वारसा आहे. आणि ज्या नाट्यगृहांमध्ये सर्वोत्तम कलाकारांनी हजेरी लावली आहे. आपली कलासादर केली आहे. अशामध्ये केशवराव भोसले नाट्यगृहाचा पहिला नंबर लागत होता. या नाट्यगृहांने काय काय पाहिले नाही.

या नाट्यग्रहणे खासा राजर्षी शाहू महाराजांना बोलताना नाटक पाहताना पाहिले होते. ज्यांनी मराठी चित्रपट सृष्टीचा पाया कोल्हापूरमध्ये घातला त्या छत्रपती राजाराम महाराजांना पाहिले होते. कला महर्षी बाबुराव पेंटरांनी रंगवलेले पडदे याच नाट्यग्रहाने पाहिले होते,या नाट्यगृहशने बालगंधर्वांना पाहिले होते, या नाट्यगृहांने खुद्द संगीतसूर्यांना आपली कला लोकांसमोर सादर करताना पाहिले होते. देश विदेशातील अनेक कलाकारांनी या नाट्यगृहांमध्ये आपली कला सादर केली होती. खरे तर अशा पद्धतीचा वारसा असणारे एकही ठिकाण संपूर्ण महाराष्ट्रामध्ये शिल्लक राहिले नव्हतं! हा कलेचा वारसा जतन करणारे हे एकमेव ठिकाण आज अस्तित्वात होतं आणि तेही १९१५ नंतर जवळजवळ सव्वाशे वर्षे झाली तरीही त्याच क्षमतेने वापरलं जात होतं .महाराष्ट्राच्या चार पिढ्यांनी या नाट्यगृहाचा उपभोग घेतला होता. आणि अजूनही काही शतके नाट्यगृहाला काही झालं नसतं. पण महान व्यक्तींचा वारसा खुजा निघाला की काय होतंय याचं उदाहरण आज आपण आपल्या डोळ्यासमोर बघतोय!

ही आग लागली का लावली गेली? हा एक प्रश्न आहेच, याचे उत्तर मिळेल का? हे ही आपण सांगू शकत नाही. आता पुन्हा आपण खूप पैसे खर्च करून एखाद्या नवीन नाट्यगृह उभाही करू , पण पुन्हा काही झालं तरी शाहू महाराजांचा स्पर्श झालेले, अनेक कलाकारांच्या आवाजानं ज्या नाट्यगृहाच्या भिंती थरथरल्या होत्या असे महान वारसा स्थळतर आपण ऊभा करु शकत नाही.

(साभार)

लोकसंसद

### भारतीय हॉकीला पुन्हा एकदा सुगीचे दिवस

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारतीय हॉकी संघाने स्पेनला २-१ गोलने पराभूत करून कांस्य पदक जिंकले. भारताने २०२० च्या टोकियो ऑलिम्पिकमध्येही कांस्य पदक जिंकले असल्यामुळे सलग दुसऱ्यांदा कांस्य पदक मिळवण्याची भारताची ही दुसरी वेळ ठरली. कारण या आधीही भारताने १९६८ च्या मेक्सिको ऑलिम्पिकमध्ये आणि १९७२ च्या म्युनिच ऑलिम्पिकमध्ये हॉकीमध्ये सलग दोनदा कांस्य पदक मिळवले होते. खरेतर हॉकी हा भारताचा राष्ट्रीय खेळ असून ऑलिम्पिकच्या इतिहासात भारताने सर्वाधिक ८ सुवर्ण पदके पटकावली आहेत. त्याशिवाय एक ऑलिम्पिक रौप्य पदक आणि चार कांस्य पदके मिळून भारताने एकूण १३ पदके जिंकली आहेत. तर यंदाचा हॉकीमधील सुवर्ण पदक विजेता नेदरलँडचा हॉकी संघ एकूण ३ सुवर्ण पदके, ४ रौप्य आणि ३ कांस्य पदके मिळवून दुसऱ्या स्थानावर आहे. यावरूनच भारताचे जागतिक पातळीवरील हॉकीमधील श्रेष्ठत्व सिद्ध होते. मात्र १९८० साली मॉस्कोमध्ये झालेल्या ऑलिम्पिकमध्ये शेवटचे सुवर्ण पदक जिंकल्यानंतर भारताला ऑलिम्पिक पदक मिळण्यासाठी तब्बल ४० वर्षे वाट पाहावी लागली. २०२० च्या टोकियो ऑलिम्पिकमध्ये आणि आता पॅरिस ऑलिम्पिकमध्ये सलग दुसऱ्यांदा कांस्य पदक जिंकल्यामुळे भारतीय हॉकीला पुन्हा एकदा सुगीचे दिवस आले आहेत.

**- प्रदीप मोरे, अंधेरी**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१० ऑगस्ट**

**१८६०:-** संगीतज्ञ, संगीतकार आणि संगीतशास्त्राचे इतिहासकार विष्णु नारायण भातखंडे यांचा जन्म. १५ वर्षे देशभर फिरुन, मौखिक व हस्तलिखित साधनांच्या आधारे त्यांनी 'हिंदुस्थानी संगीत पध्दती' हा ग्रंथ (चार खंडांत) सिध्द केला. याखेरीज 'चतुर्दंडप्रकाशिका','रागतत्त्वबोध', 'रागतरंगिणी' ,'रागलक्षण','सारामृत आणि नव रागमंजिरी' ही पुस्तकेही त्यांची. **१८८०:-** प्राचीन मराठी कवितेचे संशोधक, निबंधकार चिंतामण निळकंठ जोशी यांचा जन्म. 'श्रीधर चरित्र' व 'काव्य विवेचन' हा त्यांचा ग्रंथ. त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिध्द. **१८९८:-** लोकमान्यांचे नातू, विचारवंत, हिंदूत्ववादी तसेच केसरी, मराठा सह तरुण भारतचे संपादक पद भुषवलेले तसेच 'गीताबीज' आणि 'गीतार्थचर्चा' ही पुस्तके, तसेच 'हिंदुत्वाची राष्ट्रीय मीमांसा' या पुस्तकांसह अनेक छोटेखानी चरित्रपुस्तके लिहिणारे सावरकरवादी विज्ञाननिष्ठ पत्रकार गजानन विश्वनाथ केतकर यांचा जन्म. डॉ. खानखोजेच्या चरित्रासह अनेक पुस्तकांचे लेखन त्यांनी केले. **१९११:-** लेखक, कृषीतज्ञ डॉ. विश्वनाथ गोविंद वैद्य यांचा जन्म. 'कृषीशाला प्रवेश आणि जमिन व पाण्याची व्यवस्था', 'पीक उत्पादन व शेतीतील प्रयोग' अशी साहित्य संपदा. **१९१३:-** भाषाशास्त्रज्ञ, प्राकृत व संस्कृ तचे राष्ट्रीय पंडित डॉ. अमृत माधव घाटगे यांचा जन्म. 'संस्कृत महाकोश' आणि 'प्राकृत महाकोश' चे संपादन त्यांनी केले होते. **१९१५:-** लेखिका मानसोपचार तज्ञ मालती गोविंद रानडे यांचा जन्म. 'मनोरुग्ण : व्यथा आणि कथा' अशा विषयावरील मराठीत त्यांनी लिहिलेला पहिलाच ग्रंथ. **१९२४:-**'अंधारातील किरण', 'ऋणानुबंध' आदी कादंबऱ्या, तीन लघुकथासंग्रह व बालसाहित्य लिहिणारे रामकृष्ण जोशी यांचा जन्म. **१९३०:-** लेखक केशव रंगनाथ पानसे यांचे निधन. 'शिवसुत काव्य' आणि 'पानसे घराण्याचा इतिहास' त्यांनी लिहिला. **१९३४:-** साहित्यिक सुधीर नरहर रसाळ यांचा जन्म. 'कविता आणि प्रतिमा', 'जाणीव आणि शैली' हे ग्रंथ प्रकाशित. याशिवाय अनेक नियतकालिकांतून समीक्षात्मक लेखन प्रसिध्द. तर्कशुध्द मीमांसा करणारे एक श्रेष्ठ व मान्यवर समीक्षक म्हणून त्यांचं नाव ठळकपणानं पुढं आलं. 'कविता' हा वाङ्मयप्रकार डॉ. रसाळ यांच्या समीक्षेचा जिव्हाळयाचा विषय आहे. 'काही मराठी कवी- जाणिवा व शैली' या त्यांच्या ग्रंथात, काव्य या प्रकारात अंतर्भूत असणाऱ्या काही घटकांकडे ते आपले लक्ष वेधून घेतात. तर 'वाङ्मयीन संस्कृ ती' या समीक्षा ग्रंथात वाङ्मयाच्या संदर्भात लेखकाच्या तत्कालीन संस्कृ तीशी असलेल्या नात्याचा त्यांनी शोध घेतला आहे. तसेच 'साहित्यप्रकार : स्वरुप व अध्यापन' आणि 'गंगाधर गाडगीळ यांची निवडक समीक्षा' या दोन्ही ग्रंथनिर्मितींना त्यांचं मौल्यवान संपादनसाह्य लाभलं आहे. १९३४:-नाटककार, कादंबरीकार, चरित्रकार आणि इतिहास संशोधक अनंत नारायण भागवत यांचे निधन. 'माधवराज्यारोहण', 'पृथ्वीराज आणि संयोगिता', 'रावबाजी' मिळून ८ नाटके तसेच 'शिवरायांच्या स्वराज्य स्थापनेवर', 'पितृबंधमोचन', 'झीनत महाल' ही १८५७ च्या उठावावर कादंबरी, 'वसईचा मोहरा' हा ऐतिहासिक गोष्टींचा संग्रह, 'उमाजी नाईक', 'संभाजीराव गायकवाड' यांची चरित्रे आणि भोर संस्थान, सातारच्या प्रतिनिधी घराणे आणि होळकर शाहीच्या इतिहासाची साधने यांचे लिखाण ही त्यांची चिरस्मरणीय कामगिरी. **१९४२:-** एकांकिका, नाटयलेखक प्रा. विवनाथ जनार्दन गोडबोले यांचा जन्म. 'नऊ नंबरची कॉट','शेख महंमद' अशी साहित्य संपदा. **१९४८:-** लेखक प्रा. दशरथ आकाराम माने यांचा जन्म. 'पसायदान' हा संत साहित्य विषयक लेखसंग्रह त्यांचा प्रसिध्द. **१९५०:-** कथा-कादंबरीकार, प्रकाशक बाबा सळुबा भांड यांचा जन्म. 'लागेबंध',' झेलम ते बिआस' ही प्रवासवर्णने. 'कायापालट' हा लघुकथासंग्रह. 'जरंगा', 'काजोल', 'दशक्रिया', 'तंट्या भिल्ल' या कादंबऱ्या. 'पागोरे','शेळंब' हे ललितलेखन आणि पुष्कळसे बालसाहित्य त्यांच्या नावावर आहे. **१९५५:-** 'माझी कहाणी' या आत्मचरित्राच्या लेखिका पुण्याच्या हिंगण्याच्या अनाथ बालिकाश्रमाच्या प्रचारिका आणि आजन्म सेविका पार्वतीबाई आठवले यांचे निधन. आत्मचरित्रातून स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार. १९६६:-लेखक उध्दव साबळे यांचा जन्म. ह्यांचा 'ग्रामसेवक आणि त्यांची ग्रामपंचायत',' ग्रामनिर्माण : एक कला', 'महिला सक्षमीकरण', 'स्वयंसहायता बचतगट' असे माहितीपर ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. **१९७७:-**ध्येयवादी कीर्तनकार, कवी वासुदेव शिवराम कोल्हटकर यांचे निधन. 'कीर्तन : कला आणि शास्त्र' हे कीर्तनकलेची नव्या दृष्टीने चिकित्सा करणारे पुस्तक त्यांनी लिहिली होते. **१९९७:-** लेखक, कवी, नाटयसमीक्षक नारायण पेडणेकर यांचे निधन. **२०२३:-**'चाहूल','प्रतीक्षा' हे कथासंग्रह आणि 'एका श्वासाचा अंतर' या कादंबरीद्वारे मराठी साहित्य लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचलेल्या लेखिका अधिकार रमेशचंद्र सरकार यांचे निधन.

**संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१० ऑगस्ट


१) श्री.रमाकांत रघुनाथ वाबळे
विद्यानगर, १०-८-१९४२
२) श्रीम.वंदना विश्वनाथ म्हात्रे
कोप्रोली, १०-८-१९४२
३) श्री.गणपत सदाशिव नाटेकर
गोंधळपाडा, १०-८-१९२९
४) श्रीम.प्रतिभा परशुराम सुतार
भांडर आळी, अलिबाग १०-८-१९५१
५)श्रीम.वैशाली प्रभाकर इंदुलकर
पांडव नगरी, अलिबाग १०-८-१९५०
६)श्री.गजानन अंबाजी पाटील
कामतआळी, अलिबाग १०-८-१९५७
७)श्री काशिनाथ मधुसूदन कामत
रामनाथ रोड, अलिबाग १०-८-१९५५

# समुद्रकिनारा सुशोभिकरण अंतिम टप्प्यात

## ■ गणेशोत्सवाआधी उद्घाटनाची प्रतीक्षा

। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।

**मुरुड-जंजिरा या ठिकाणी दरवर्षी लाखो पर्यटक देश-विदेशातून येत असतात. याठिकाणी पर्यटकांची संख्या वाढावी, यासाठी मुरुड समुद्रकिनारा सुशोभिकरणासाठी शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी प्राप्त झाला होता. एकाच वेळी ४०० वाहने उभी राहू शकतील, असा वाहनतळ तयार करण्यात आला असून, सोनेरी सूर्यास्त होताना किनाऱ्यावर बसून पाहता येणार आहे. गाडी पार्किंग करून चार पावले चालताच वाळूत जाता येणार आहे.**



मुरुड समुद्रकिनारा सुंदर असून, या ठिकाणी पर्यटकांना सुविधा मिळत नसल्याने पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस कमी होत होती. पर्यटकांच्या दृष्टीकोनातून मुरुड समुद्राकिनारा सुशोभिकरण केल्याने मुरुडमध्ये पर्यटकांची संख्येत नक्कीच वाढ होईल. यामधून स्थानिकांना चांगला रोजगार जगार मिळेल. या नगरपरिषदेच्या वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून मुरुड समुद्रकिनारा सुशोभिकरण करण्याकरिता ११ कोटी ४३ लाख १२ हजार ७१६ रुपये मंजूर करण्यात आले होते. या निधीतून सुशोभिकरण, वॉक वे, फुड जॉईट करणे, वाहनतळ व अनुषंगिक सुविधा करणे आदी सुविधांचा समावेश आसणार आहे.

त्यामुळे पर्यटकांचा ओघ वाढून यामधून स्थानिकांना रोजगार उपलब्ध सुविधा उभारण्यात आला आहे. हंगामात हजारो पर्यटक आले तरी त्यांना हॉटेलसमोर पार्किंग मिळणार आहे.

मुरुड समुद्रकिनारी असलेली हॉटेल गणपती सुट्टीसाठी सज्ज झाली आहेत. समुद्रकिनारी असलेले नवनवीन चविष्ट पदार्थांचे स्टॉल्स, किनाऱ्यावरील घोडसवारी, मोटार बाईक, पाणीपुरी, भेळपुरी अशा विविध स्टॉल्सने किनारा बहरला आहे.

नगरपालिकेने समुद्रकिनारी असलेली विश्रामधाम या बागेचे नूतनीकरण केल्याने त्याचा लाभ येणाऱ्या पर्यटकांना होणार आहे. पालिकेचे कर्मचारी समुद्रकिनारी दिवसातून तीन वेळा स्वच्छ करतात, मुरुडला असणारे जलदुर्ग जंजिरा व पद्मदुर्ग पर्यटकांसाठी सज्ज झालेत. मुरुडपासून जवळच असणारे गारंबी धारण, कुडे मांदाड लेणी, खोकरी, दत्तमंदिर या पर्यटन स्थळावर स्वच्छता करून खाण्यापिण्याचे स्टॉल्स उभारण्यात आले असून, पर्यटकांसाठी मुरुड तालुका सज्ज आहे.


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**श्रीमती द्रौपदी धर्मा कदम, स्मरणार्थ अलिबाग**

## समुपदेशक पदासाठी अर्ज भरण्याच्या मुदतीत वाढ

**। अलिबाग । वार्ताहर ।**

राज्य परिवहन रायगड विभागासाठी मानद तत्त्वावर दोन समुपदेशक पदासाठी अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ३० जून २०२४ अशी निश्चित करण्यात आली होती. परंतु, या तारखेस १४ ऑगस्टपर्यंत वाढ करण्यात आली आहे, अशी माहिती राज्य परिवहन विभागाचे रायगड विभाग नियंत्रक यांनी दिली. तसेच जाहितरातीत नमूद केलेल्या इतर अटी व शर्तीमध्ये काहीही बदल नाही, असेही त्यांनी म्हटले आहे. तरी समुपदेशक पदाकरिता इच्छुक उमेदवारांनी अधिक माहितीसाठी कृषीवल मध्ये दि. १३ जून रोजी प्रसिद्ध झालेली पाहावी. तसेच इच्छुक व पात्र उमेदवारांनी अधिक माहितीसाठी विभाग नियंत्रक, राज्य परिवहन विभाग, पेण यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

## रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**। नेरळ। प्रतिनिधी ।**

प्राथमिक शिक्षक समितीचे नेते राजेश जाधव यांच्या स्मृतिदिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. नेरळ येथे आयोजित या शिबिरात ४५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.



महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती कर्जत यांच्यावतीने शिक्षक नेते स्वर्गीय राजेश जाधव यांच्या स्मरणार्थ तसेच जागतिक आदिवासी दिन आणि क्रांती दिनाचे औचित्य साधून रक्तदान शिबीर नेरळ येथील हुतात्मा हिराजी पाटील सामाजिक सभागृहात आयोजित करण्यात आले होते.

या शिबिराचे उद्घाटन संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय येलवे, तानाजी गवारी, किशोर पाटील, कोकण उपाध्यक्ष शायलिक जामघरे, राज्य सदस्य अनिल नागोठकर, जिल्हा उपाध्यक्ष मोंढे, जिल्हा समन्वयक सुरेश चव्हाण, जिल्हा जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर बुरुड, तालुका सचिव मारुती यंदे, तालुका महिला आघाडी प्रमुख सविता बोराडे, तालुका उपाध्यक्ष पंढरीनाथ पाटील, संतोष मगर, आशिष उंबरे, अनंत खैरे, रुपेश गायकवाड, राजेश गंजेवार, राजेश मेचकर, संजय थोरात उपस्थित होते. सार्वजनिक रक्तदाते राजाभाऊ कोठारी यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदान शिबीर झाले.

## जाहीर हरकत

सर्व संबंधितांस कळविण्यात येते की, श्री. प्रकाश नारायण भोईर, वगैरे, राहणार फकीरपाडा, पो. झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड, ह्यांनी दिलेल्या माहीतीवरून व दर्शविलेल्या कागदपत्रांवरून सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे नांदईपाडा व मौजे सुरेखार ता. अलिबाग, येथिल खालील नमूद वर्णनाच्या जमिन मिळकतींमध्ये माझ्या अशिलांचा अविभक्त हिस्सा, हक्क व अधिकार आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आ.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|---|
| १. | नांदईपाडा, ता. अलिबाग | १८/१ | ०-१८-००<br>०-०२-१० पो.ख.<br>०-२०-१० एकूण | १-०२ |
| २. | नांदईपाडा, ता. अलिबाग | १८/२ | ०-५८-४० एकूण | ५८४-०० |
| ३. | नांदईपाडा, ता. अलिबाग | ६४ | ०-०८-६०<br>०-०१-३० पो.ख.<br>०-०९-९० एकूण | १-७५ |
| ४. | नांदईपाडा, ता. अलिबाग | ६७ | ०-०७-३०<br>०-००-८० पो.ख.<br>०-०८-१० एकूण | १-७० |
| ५. | नांदईपाडा, ता. अलिबाग | ७१ | ०-३४-००<br>०-०३-०० पो.ख.<br>०-३७-०० एकूण | ८-०० |
| ६. | सुरेखार, ता. अलिबाग | ५७ | १-१४-३०<br>०-०५-८० पो. ख.<br>१-२०-१० एकूण | १५-५० |
| ७. | सुरेखार, ता. अलिबाग | ७२ | ०-१५-०० एकूण | ००-४४ |

माझ्या अशिलांचे हक्क डावलून सदर मिळकतीच्या हक्कनोंदपत्रकी केवळ ७/१२ सदरी नाव असल्याचा गैर फायदा घेवून श्री. किसन पांडूरंग पाटील, वगैरे लोक सदर मिळकती विकण्याचा प्रयत्न करीत आहेत. म्हणून माझ्या अशिलांनी सदर जमिन मिळकतीं संदर्भात श्री. किसन पांडूरंग पाटील, वगैरे यांच्या विरूध्द अलिबाग येथिल मा. दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) यांचे न्यायालयांत रेग्युलर दिवाणी मुकदमा क्र. १५१/२०२२ हा दावा वाटपाकरीता, निरंतर मनाई आदेशाकरीता व अन्य मागण्यांकरीता मा. न्यायालयांत दाखल केला असून, सदर दाव्याचे काम अद्यापी मा. न्यायालयांत प्रलंबित आहे. अशा परिस्थितीत माझे अशिलांच्या संमतीशिवाय सदरील मिळकतीचा कसल्याही प्रकारचा व्यवहार कोणीही करू नये. माझे अशिलांच्या संमतिशिवाय सदरील मिळकतीबाबत कोणीही कसल्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तो व्यवहार माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच, नाईलाजास्तव माझे अशिलांस जमिन खरेदीदारांविरूध्द उचित ती दिवाणी अथवा फौजदारी कार्यवाही करणे भाग पडेल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : ९/०८/२०२४.

सही/
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
हरकतदारांचे वकील

**पान १ वरून**

## शिर्डी विमानतळाला जप्तीची नोटीस

आहे. शिर्डी विमानतळ हे कोपरगाव तालुक्यातील काकडी मल्हारवाडी ग्रामपंचायतीच्या हद्दीत येते. विमानतळ प्राधिकारणाने काकडी ग्रामपंचायतचा ८ कोटी ३० लाखांचा कर थकवला आहे. यामुळे ग्रामपंचायतीने शिर्डी विमानतळ प्रशासनाला जंगम मालमत्ता जप्तीचे वॉरंट बजावले आहे. २०१७ पासून विमानतळ प्रशासनाकडून विविध स्वरुपातील कर थकीत आहे. अनेकदा पाठपुरावा करूनही थकबाकी जमा होत नाही. यामुळे ग्रामपंचायतीने हे पाऊल उचलले आहे. विमानतळ प्राधिकरण, मुख्यमंत्री, पालकमंत्री तसेच शासन दरबारी अनेकदा पाठपुरावा करूनही कराची रक्कम जमा झाली नाही. यामुळे ग्रामपंचायतीने जप्तीची नोटीस पाठवली आहे. विमातळाची टर्मिनल बिल्डिंग, पेट्रोल पंप, एटीसी टॉवरसह मालमत्ता जप्तीचे वॉरंट ग्रामपंचायतीने बजावले आहे. कर जमा न केल्यास आम्ही आमच्या अधिकाराचा वापर करून जंगम मालमत्ता जप्त करणार असल्याचा इशारा सरपंच पूर्वी गुंजाळ आणि उपसरपंच भाऊसाहेब सोनवणे यांनी दिला आहे.

## ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा मोर्चा

सेवानिवृत्तीचे वय निश्चित करा, सेवा ज्येष्ठता यादी प्रसिध्द करा, किमान वेतन, भविष्य निर्वाह निधी न देणाऱ्या ग्रामपंचायतीवर कारवाई करण्यात यावी, भरती करताना संघटनेला विश्वासात घेऊन करावी, राज्य व्यवस्थापन कक्ष पंचायत पुणे यांच्या आदेशाप्रमाणे किमान वेतन ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या खात्यात लवकरात लवकर जमा करण्यात यावे, भविष्य निर्वाह निधी करीता ईपीएफचे खाते उघडण्यात यावे, जलसुरक्षा रक्षक मानधन वेळेवर देण्यात यावे, शंभर टक्के पदांची भरत्ती तातडीने करण्यात यावी, शनिवार रजेबाबत सर्व ग्रामपंचायतीला आदेश करण्यात यावेत, असा अनेक मागण्यांसाठी मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाला अलिबाग रायगड जिल्ह्यातील असंख्य कर्मचारी सहभागी झाले होते. यावेळी सरकार विरोधात घोषणा देण्यात आल्या.

## ४०० सुरुंग स्फोटाला ग्रामस्थांचा विरोध

सकाळी २५ व सायंकाळी २५ असे ४०० सुरुंग स्फोट करण्याचे ठरल्यानंतर ग्रामस्थ शांत झाले.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळालगत ओवळे गावातील काही ग्रामस्थांनी हक्काचे भूखंड न मिळाल्याने घर रिकामे केले नाही. काही कुटूंबे अजूनही त्याचठिकाणी राहतात. ग्रामस्थांना त्यांच्या सोयीनूसार भूखंड ताब्यात द्यावेत, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात होती. त्यामुळे काही ग्रामस्थांना प्रकल्पाच्या नुकसानीपोटी मिळणारे भूखंड अजूनही मिळू शकले नाही. त्यामुळे विमानतळ प्रकल्पापासून हाकेच्या अंतरावर सुरुंग स्फोटाचे हादरे बसल्याने ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे.

ओवळे ग्रामस्थांनी या स्फोटांना विरोध केल्यामुळे पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला. पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक नितीन ठाकरे यांनी तातडीने ओवळे गावात धाव घेऊन संतापलेल्या गावकरी व सिडको अधिकारी यांच्यात बैठक लावून हा प्रश्न संवादाने सोडविला. या बैठकीत दिवसाला पन्नास स्फोट करण्याचे ठरले. त्यामुळे पुढील काही दिवसात ओवळे गावामागील लहान टेकडी भूईसपाट केली जाणार आहे.

## २०० रुपयांसाठी हत्या; आरोपी अटक

मुख्य पर्यवेक्षक म्हणून काम करत होता. सुशांतच्या हत्येनंतर तो काम करत असलेल्या हॉटेलमधील सुशांतचे सहकारी कर्मचारी व इतरांची चौकशी पोलिसांनी गुरुवारी सकाळी सुरू केली. सुशांत हा शिरढोण गावातील धनाजी महाडिक यांच्या चाळीत राहत होता. सुशांतचा गळा चिरुन त्याची हत्या केल्याने परिसरात नेमके सुशांतचे वैरी कोण याबाबत चर्चा सुरू होती. पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक नितीन ठाकरे यांनी याप्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल केल्यानंतर स्थानिक पोलिसांसह नवी मुंबई गुन्हे अन्वेषण विभाग क्रमांक २ चे वरिष्ठ पोलीस निरिक्षक उमेश गवळी यांचे पोलीस पथक हत्या करणाऱ्यांच्या मागावर होते. अखेर पोलिसांनी सुशांत ज्या हॉटेलमध्ये काम करत होता त्याच हॉटेलमधील सुशांतचा सहकारी अमितला ताब्यात घेतले. अमितच्या चौकशीअंती सुशांतच्या हत्येचा उलगडा झाला.

सुशांत हा हॉटेलमध्ये जुना कामगार असल्याने इतर परप्रांतीय कर्मचाऱ्यांचा त्यावर विश्वास होता. हे कामगार गावी पैसे पाठविण्यासाठी सूशांतला सांगत असत. सुशांत कामगारांचे पैसे ऑनलाईन पाठविल्यानंतर जादा शंभर ते दोनशे रुपये कामगारांकडून घेत असे. सुशांतकडे अमितने सुद्धा १० हजार रुपये गावी त्याच्या कुटुंबियांना पाठविण्यासाठी दिले होते. बुधवारी अमितने दिलेल्या बॅंकखात्यावर ती रक्कम सुशांतने पाठविली होती. मात्र वरील २०० रुपये सुशांत अमितकडे मागत होता. यावर अमित व सुशांत यांच्यात वाद सूरु होते. रात्री अमित व सुशांत हे हॉटेलचे काम संपवून घरी जात असताना याच दोनशे रुपयांच्या वादाचे पर्यवसन भांडणात झाले. अमितजवळच्या पिशवीत त्यावेळी चाकू होता. अमित व सुशांत यांच्यात झटापटी झाली. त्यावेळी रागाच्या भरात अमितने त्याच्याजवळील चाकूने सुशांतच्या गळ्यावर वार केल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले. अमितला पनवेल येथील न्यायालयात पोलिसांनी हजर केले आहे.

## कोकणची सुरक्षा मजबूत होणार

कोकण रेल्वे स्थानकांदरम्यान एखादा गुन्हा घडल्यानंतरही त्याबाबतची तक्रार प्रवासी मुंबईत आल्यानंतर करतात. त्यामुळे रेल्वे सुरक्षा दल, स्थानिक पोलिसांशी संपर्क साधून गुन्हा संबंधित यंत्रणेकडे वर्ग करण्याचे काम लोहमार्ग पोलिसांना करावे लागते. रेल्वे सुरक्षा दलाशी संपर्क साधून कारवाई करावी लागते. आपल्या हद्दीतील स्थानके, तसेच प्रवाशांची सुरक्षा व घडणाऱ्या गुन्ह्यांचा तपास करता यावा यासाठी कोकण रेल्वेवरील तीन स्थानकांमध्ये पोलीस ठाणे स्थापन करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवण्यात आल्याची माहिती लोहमार्ग पोलीस आयुक्त कैसर खालिद यांनी दिली आहे.

रोहा, रत्नागिरी आणि कणकवली येथे महत्त्वाची तीन पोलीस ठाणी स्थापन करण्यात येतील आणि या पोलीस ठाण्यांच्या अखत्यारित अन्य स्थानकांचा समावेश करण्यात येईल. त्यासाठी वरिष्ठ दर्जाचे अधिकारी, तसेच कर्मचारी आदी मनुष्यबळही उपलब्ध करण्याची मागणी करण्यात आली होती. याबाबत आज गृह विभागाने निर्णय घेतला आहे. तिन्हीपैकी रत्नागिरी लोहमार्ग पोलीस ठाण्याला मंजुरी देण्यात आली आहे. पोलीस ठाण्यासाठी हद्द निश्चित करण्याचा प्रस्ताव पोलीस महासंचालकांना तात्काळ पाठवावा, असा अध्यादेश काढण्यात आला आहे.

## ‘लोकसभेचा झटका जोरदार लागला’

आता कांदा निर्यात बंदी करायची नाही, यावर सरकारचं एकमत झालं आहे. बांगलादेशात आपला कांदा जातो. तिकडे परिस्थिती बदलेल. त्यांनी व्यापाऱ्यांना माल देताना आधी पैसे देण्याचे आवाहनही केले. महिलांचे सन्मान आणि लाडकी बहीण योजना-महिलांसाठी बोलताना अजित पवार म्हणाले, बरेच वर्ष आम्ही समाजात महिलांना मान सन्मान दिला. आरक्षण दिलं, पण सबलीकरण राहीलं. काल आम्ही मुख्यमंत्र्यांसोबत बैठक केली. लाडकी बहीण योजनेत ज्यांनी फॉर्म भरले आहेत, त्यांच्या खात्यांची माहिती आमच्याकडे आली आहे. येत्या १७ तारखेला तुमच्या खात्यात पैसे येणार. ही योजना बंद करण्यासाठी नाही, ती कायमस्वरुपी चालू राहणार आहे, असे सांगत लोकसभा निवडणुकीत अजित पवार गटाची फक्त एक जागा निवडून आली याबाबत अजित पवारांनी खंत व्यक्त केली.

## क्रेनची ट्रॉली तुटली; पाटील,कोल्हे बचावले

जनसन्मान यात्रेच्या माध्यमातून नागरिकांशी संवाद साधत आहेत. तर दुसरीकडे शरद पवार गटानेही शिवस्वराज्य यात्रेला आजपासून सुरूवात केली आहे. आज राज्यात पुन्हा रयतेचे राज्य आणण्यासाठी शिवस्वराज्य यात्रा काढणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांनी दिली आहे. ही यात्रा आज (शुक्रवारी) शिवनेरी किल्ल्याच्या पायथ्यापासून सुरू झाली आहे. महायुतीचे काळे कारनामे यात्रेच्या माध्यमातून जनतेपुढे उघड केले जातील, असा इशारा त्यांनी दिला. याप्रसंगी क्रेनच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. खाली उतरताना अर्ध्यावर पोहचल्यावर क्रेनची ट्रॉली तुटली. जयंत पाटील, अमोल कोल्हे, रोहिणी खडसे, मेहबुब शेख खाली पडण्याची शक्यता होती. सुदैवाने कुणालाही दुखापत झाली नाही पण, यात्रेच्या सुरुवातीलाच ही घटना घडल्याने उपस्थितांमध्ये खळबळ उडाली.

## मोदी सरकारही पडणार-चव्हाण

मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते पत्रकार भवन येथे झाले. यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे, माजी विशेष पोलिस महानिरीक्षक चंद्रशेखर दैठणकर, माजी सहायक पोलिस आयुक्त भानुप्रताप बर्गे, मिलिंद गायकवाड आदी उपस्थित होते.

पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, २००४ ते २०१४ या काळात काँग्रेसची सत्ता असताना नागरिकांच्या हक्काचे कायदे केले गेले. त्याचे जागतिक पातळीवर कौतुक झाले. २००४ चा निकाल हा सोनिया गांधी यांचा चेहरा आणि त्यांच्या जाहीरनाम्यामुळे झाला होता. त्यामुळे मनमोहन सिंग यांच्याकडून जाहीरनामा पूर्ण करुण घेण्याची जबाबदारी सोनिया गांधी यांच्यावर होती. माझ्या मुख्यमंत्रिपदाच्या काळातही राजीव गांधी जीवनदायी विमा योजना आणली. ही आताच्या आयुष्यमान भारत योजनेपेक्षा चांगली योजना होती. आताच्या सरकारकडून शिक्षण आणि आरोग्यावरचा खर्च कमी होत आहे, हे चिंताजनक आहे, असेही पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितले.

महायुती सरकारच्या विरोधात नागरिकांमध्ये संताप आहे. ठेकेदार हे सरकार चालवत आहेत. पैसे घेऊन अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या जात आहेत. लाडकी बहिण योजनेसाठी पैसे लागत असल्याने अन्य खात्यांना पैसे मिळत नाहीत. यावरून मंत्रीमंडळाच्या बैठकीत अर्थमंत्री व कृषिमंत्र्यांची भांडणे झाली. आरोग्य व्यवस्था, रुग्णाचे हक्क याचा बोजवारा उडाला आहे. त्यामुळेच विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या १८३ पेक्षा जास्त जागा निवडून येतील, असा दावा पृथ्वीराज चव्हाण यांनी केला.

महाविकास आघाडीच्या जागा वाटपाच्या, जाहीरनामा तयार करण्याच्या बैठका सुरु झाल्या आहेत. विधानसभा निवडणूक दिवाळीपूर्वी किंवा दिवाळीनंतरही होऊ शकते. दिवाळीनंतर झाल्यास लाडकी बहीण योजनेचा आणखी एक हप्ता महिलांना मिळू शकेल, असे पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितले.


### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल १) श्रीमती. मीनाक्षी राजेश घरत, २) श्री. प्रदिप अंबाजी घरत दोघेही रा. जासई, ता. उरण, जि. रायगड - ४१०२०६. यांनी कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे-खांडस, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे,**

| जमीन मालक | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र हे आर-पॉ | आकार रू.पै |
|---|---|---|---|---|
| लहु कुंडलिक म्हात्रे | ८१ | ३ | १.२२.०० पैकी लिहून देणार यांच्या मालकीचे ०.५०.०० क्षेत्र | १.१२<br>०.४६ |

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा-कबजा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी, हक्क, मृत्युप्रत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

तारीख :- १०/०८/२०२४

**ॲड. कल्याणी रवी गायकर**
पत्ता- प्रेमसिंधु अपार्टमेंट,
कोतवालनगर-कर्जत, जि. रायगड
मो. नं. ८४४६१४८७८१

## रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि., अलिबाग.

**फक्त सभासदासाठी**
**सभेची नोटीस**
**१०० वी वार्षिक सर्वसाधारण सभा**
**सन २०२३-२४**

सभेची तारीख : रविवार दि. २५/०८/२०२४ वेळ : दु. १२.०० वा.
सभेचे ठिकाण: रॉयल गार्डन मंगल कार्यालय, मुद्रे बु., कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड.

संस्थेच्या सभासदांची १०० वी वार्षिक सर्वसाधारण सभा खाली नमुद केलेल्या कामासंबंधी विचार विनिमय करण्यासाठी आणि त्यानुसार निर्णय घेण्यास मा. श्री. भगवान परशुराम घरत, चेअरमन यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे.

**सभेपुढील कामे -**

१. मागील वर्षी रविवार दि. ०३/०९/२०२३ रोजी झालेल्या ९९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून मंजूर करणे.
२. दि. ३१/०३/२०२४ रोजी संपलेल्या वर्षाचा ( १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४) अहवाल वाचून मंजूर करणे.
३. दि. ३१/०३/२०२४ रोजीचा आर्थिक ताळेबंद, नफातोटा पत्रक यांस मंजुरी देणे.
४. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२४ ते २०२५ चे अंदाज पत्रक व गतवर्षी जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
५. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या दि. ३१/०३/२०२४ च्या नफा वाटणीस मंजूरी देणे.
६. वैधानिक लेखापरिक्षक यांजकडून आलेला सन २०२३-२४ चा तपासणी अहवाल वाचणे, त्याचा दोष दुरुस्ती अहवाल वाचून मंजूर करणे,
७. पुढील आर्थिक वर्षाकरिता वैधानिक हिशेब तपासणीसाची नियुक्ति करणे.
८. संस्थेच्या सन २०२३-२४ अधिकच्या भांडवलीय व महत्वाच्या खर्चास मंजुरी देणे.
९. महाड येथील जमिन खरेदी बाबत चर्चा करुन निर्णय घेणे.
१०. संस्थेच्या अलिबाग येथील इमारती मधील सदनिकेचे डागडूजी, रंगकाम, लोखंडी रॉक कामाकरीता केलेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरी देणे.
११. संस्थेच्या सर्व शाखा ईमारतींचे दुरुस्ती व रंगकाम करणे बाबत चर्चा करुन निर्णय घेणे.
१२. सर्वसाधारण सभेस उपस्थित राहाणाऱ्या सभासदांस चहापाणी, अल्पोपहार, प्रवास खर्च, त्यासाठी रुपये १०००/- देणे बाबत मंजूरी देणे.
१३. संस्थेच्या शतक महोत्सवी वर्षा निमित्त होणाऱ्या खर्चास मंजूरी देणे.
१४. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या पोटनियम दुरुस्तीस मंजूरी देणे. (अहवालात समाविष्ट आहे.)
१५. मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

दिनांक : १०/०८/२०२४

**श्री. राजेंद्र का. पाटील** (मानद सचिव ) | **सौ. रेश्मा कृष्णा घुमाळ** (व्हा. चेअरमन) | **श्री. भगवान परशुराम घरत** (चेअरमन)

**विशेष सूचना**

१. गणपूर्तीच्या अभावी सभा स्थगित करावी लागल्यास त्याच ठिकाणी एक तासानंतर सभा घेण्यात येईल, त्यास गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.
२. अहवाल व हिशेबाच्या परिशिष्टाबाबत काही शंका अगर माहिती हवी असल्यास संस्थेच्या कार्यालयाकडे दि. २०/०८/२०२४ पर्यंत कळवाव्यात. तद्नंतरच्या शंकांची अगर माहितीची उत्तरे दिली जाणार नाहीत.
३. सभासदांस काही ठराव पाठविणे असल्यास त्यांनी दि. २०/०८/२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत पोहोचतील अशा बेताने पाठवावेत.

सही /-
**सेक्रेटरी**
**रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षक सह. पत. लि.अलिबाग**

पॅरिस ऑलिम्पिक 2024



‘आयफेल’ टॉवरवरून...

विनायक दळवी

# ...तर प्रकरण अंगाशी आलं नसतं

विनेश फोगाट प्रकरण भारतीय ऑलिम्पिक असोसिएशन आणि पॅरिस ऑलिम्पिकला आलेले सर्व पदाधिकारी सपोर्ट स्टाफ आणि आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच्या सदस्या नीता अंबानी भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्ष पी.टी.उषा यांनी वेळेआधीच सावध होऊन प्रकरण हाताळलं असतं तर भारतावर पदक गमावण्याची वेळ आली नसती. खरंतर यासाठी प्रत्येक खेळातले जी मुरलेली माणसे आहेत. तज्ज्ञ आहे आणि अनुभवी आहेत, अशा अनेक प्रकरणातून त्यांनी मार्ग काढलेले आहेत अशा लोकांचा समावेश भारतीय पथकामध्ये असायला हवा होता. एखादा खेळाचा अनुभव नसलेला डॉक्टर किंवा अधिकारी या प्रकरणी फक्त नियम आणि गोष्टी वाचून, त्यानुसार काम करत असतो. त्याऐवजी या प्रकरणात जर अनुभवी खेळाचे संघटक असते, तर कदाचित हे प्रकरण भारताच्या अंगाशी आलं नसतं. याबाबत गेले ४० वर्ष ॲथलेटिक क्षेत्रात काम करणाऱ्या एका पदाधिकाऱ्याशी मी बोललो त्यांनी सांगितलं की, आपल्याला रौप्यपदक पाहिजे म्हणून आता जो आपण आटोकाट प्रयत्न करतोय. आपण वेळ आणि पैसा प्रचंड घालवला. त्याऐवजी जर सपोर्ट स्टाफ आणि डॉक्टर आणि त्या खेळाचे पॅरिसमध्ये आलेले अधिकारी यांनी जर वेळीच सावध होऊन पावलं उचलली असती, तर हे प्रकरण भारताच्या अंगाशी न येता विनेशला रौप्य पदक सहज मिळालं असतं. त्याबाबत काय करता आल असत हे आपण जाणून घेऊया.

एक प्रयत्न असा करता आला असता की, विनेशला अगदी तात्काळ वजन कमी करण्यासाठी जुलाब व्हायच्या गोळ्या दिल्या गेल्या असत्या, तर ती पूर्णपणे डीहायड्रेट झाली असती. अशावेळी तिला ऑलिम्पिक आयोजन समितीच्या डॉक्टरांमार्फत आणि त्यांच्याच हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करता आलं असतं. म्हणजे काय झालं असतं की विनेश ही आजारी आहे वजन करायच्या वेळी ती फिट नव्हती म्हणून तिला हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागले आणि जुलाब जास्त झाले, आजारी पडली चेहरा अगदी टाकून ती बसलेली दिसली असती तर त्या गोष्टी खोडून टाकणं आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच्या वैद्यकीय आणि अन्य समित्यांना शक्य झाले नसते. कारण हॉस्पिटल आणि त्यांच्या डॉक्टरांनी दिलेले सर्टिफिकेट्स किंवा परवानग्या रद्द करता आल्या नसत्या. म्हणजे विनेशने मुद्दाम जाणून बुजून हे आजारपण ओढवून घेतले हे सिद्ध करावे लागले नसतं. त्याचा दुसरा अर्थ असा की विनेश वजनाच्या आधी आजारी होती म्हणून ती खेळू शकत नाही हे पॅरिस ऑलिम्पिक समितीच्या वैद्यकीय टीमने वैद्यकीय अधिकाऱ्यांनी स्पष्ट केल्यामुळे त्याबाबत आक्षेप आयओसीला घेता आला नसता. दुसरी गोष्ट जर सकाळी विनेश फोगाटने आटोकाट प्रयत्न करून देखील वजन कमी होत नाही हे लक्षात आलं होतं अशावेळी आणखी एक उपाय होता तिच्या शरीरावर काहीतरी मारहाणीच्या आणि त्यामुळे झालेल्या दुखापतीच्या खुणा ठेवून ती हॉस्पिटलमध्ये दाखल झाली असती. ती बाथरूममध्ये घसरून पडली आणि त्यामुळे तिला मार लागलाय आणि त्यामुळे ती आजची अंतिम फेरीची लढत खेळू शकत नाही आणि त्यामुळे ती वजन करायला देखील येऊ शकत नाही अशी भूमिका भारतीय व्यवस्थापनाला घेता आली असती. असा शरीरावर काही इजा करून तिला तात्काळ ऑलिम्पिक समितीच्या हॉस्पिटलमध्येच त्यांनी दाखल करून त्यांच्या डॉक्टरांमार्फत दुखापतीबाबत निदान करून घेता आलं असतं आणि त्या निदानानंतर त्यांनी केलेल्या निदानाला खोडून काढता आलं नसतं. म्हणजेच विनेश ही लढती आधी आणि फिट होती ती बाथरूममध्ये घसरून पडल्यामुळे तिला मार लागला आहे. ती खेळू शकत नाही. अंतिम सामन्यात त्यामुळे प्रतिस्पर्धी संघाला विजयी घोषित करून सुवर्णपदक देण्यात आले असते आणि विनेशला तिच्या हक्काचं रौप्यपदक मिळालं असतं मात्र, यासाठी भारतीय संघासोबत आलेल्या चमूतील सपोर्ट स्टाफमध्ये जाणकार मंडळींची गरज होती. परिस्थितीतून योग्य तऱ्हेने मार्ग काढण्याऱ्या माणसांची गरज होती. अशा बिकट परिस्थितीत अनेक वेळा खेळाडू गेलेले असतात. त्यावेळी त्यांनी काय काय केलं तर तो अनुभव विनेशच्या प्रकरणी कामी आला असता. मात्र, आपण त्या उलट हातावर हात ठेवून बघत बसलो. आयओसीच्या सदस्य नीता अंबानी इथे पॅरिसमध्ये असून देखील त्यांनी काही केलं नाही. पी टी उषा या हॉस्पिटलमध्ये तिला भेटायला गेल्या मात्र, त्यांनी त्या वेळेपर्यंत या प्रकरणी विनेशला पदक मिळावं किंवा विनेशवर अन्याय झालाय त्याबाबत काहीही केलं नव्हतं. कारण आयओसी किंवा अन्य पदाधिकारी उशिरा जागे झाले. तिसरी गोष्ट याप्रकरणी पॅरिसमध्ये असलेल्या पथकातील सर्व संबंधितांना जाब विचारला जाणार आहे किंवा नाही. त्या प्रत्येकाने या प्रकरणी विनेशला सहाय्य करण्यासाठी काय काय केले आणि किती वेळाने केले याचा अहवाल मागविला जाणार आहे का आणि सरते शेवटी विनेश अंतिम फेरीत पोहोचल्यानंतर खरंतर आपण अधिक सावध असायला हवे होते. त्यावेळी आदल्या दिवशी सर्वजण पार्टी करण्यात मशगुल होते. असं कळतं ही गोष्ट खरी असेल तर अतिशय गंभीर बाब आहे. कारण पदक मिळण्याच्या आधीच असा आनंद व्यक्त करणे म्हणजे मूर्खपणा होता आणि त्या आनंदाच्या भरात काही मंडळी आपलं कर्तव्य करण्याचे विसरून गेलेले दिसतात. खरंतर त्यावेळी अतिशय सावध राहून वजनाबाबत काळजी घेणे गरजेचे होतं कारण विनेशचे वजन आधी देखील इतर स्पर्धांमध्ये अचानक वाढलेल आहे. तिला वजन वाढल्यामुळे देखील याआधी बाहेर पडावं लागलं होतं. अशा खेळाडूच्या बाबतीत येथे असलेले सर्व संबंधित आणि सरकारने प्रचंड पैसा खर्च करून पाठवलेले अनेक अधिकारी आणि सदस्य काय करत होते. हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८९३५७७५
- चौल येथे कॉटेजकरीता आणि घरकामासाठी स्त्री-पुरूष किंवा जोडपे पाहिजे. संपर्क : ९८२००२९४५८
- अलिबाग जेनेरिक मेडिसीन स्टोअर ब्राम्हण आळी, अलिबाग फार्मासिस्ट (डी.फार्म लायसंस असणे आवश्यक) मुलगा/मुलगी हवे आहे. संपर्क : ८००७०२६२६६
- वाडगाव फाट्यावर कॉटेज सांभाळायला कामगार पाहिजे. संपर्क : ९७६२७७७९७५
- कष्टाळू महिला नेमणे आहेत. स्टायपेंड-प्रथम वर्ष ७०००, द्वितीय वर्ष ६०००, तृतीय ५००० दर महिना किमान पात्रता १० वी पास संपर्क : ८३९०४२४२२२.
- अलिबागमधील तुळजा भवानी पेट्रोल पंप, (रायगड बाजारच्या बाजूला) येथे पेट्रोल भरण्याकामी मुले पाहिजे आहेत. संपर्क ८६०५०९२२४७, ९२७२६४८४५४
- झिराड आणि मांडवा येथील पिकअप व 407 वर ड्रायवर हवा आहे. पगार रू. १५०००-१८००० Mob : 9421954348

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# खंडाळ्यात रंगला कुस्त्यांचा फड

## स्पर्धेत २५०हून अधिक मल्लांचा सहभाग

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**अलिबाग तालुक्यातील खंडाळे येथील महावीर ग्रामस्थ मंडळाच्या वतीने कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. नागपंचमीच्या निमित्ताने शुक्रवारी (दि.९) दुपारी या स्पर्धेला सुरुवात झाली. यावेळी खंडाळ्याचे सरपंच नासिकेत कावजी, अलिबाग तालुका कुस्तीगीर संघटनेचे पदाधिकारी खंडाळे ग्रामस्थ, वेगवेगळ्या भागातील कुस्तीगीर मल्ल उपस्थित होते.**



गेल्या अनेक वर्षापासून खंडाळेमध्ये कुस्ती स्पर्धा भरविली जाते. पावसाळी हंगाम सुरु झाल्यावर पहिल्या सणाच्या मुहूर्तावर ही स्पर्धा भरविली जाते. पूर्वी ही स्पर्धा तालुक्यापुरती मर्यादीत होती. मात्र गेल्या अनेक वर्षापासून या स्पर्धेचा विस्तार वाढू लागला आहे. अलिबाग तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील व मुंबई, ठाणे जिल्ह्यातील मल्ल या स्पर्धेमध्ये सहभाग घेतात. त्यामुळे नवनवीन मल्लांची कुस्तीमधील कसरत या निमित्ताने पहावयास मिळत आहे. मल्लांची कावेबाजी एक वेगळे आकर्षण या निमित्ताने पाहण्यास मिळत आहे. पूर्वी फक्त शाळकरी मुलांसह पुरुषांच्या स्पर्धा घेतल्या जात होत्या. मात्र गेल्या काही वर्षापासून मुलींसह महिलांच्या कुस्ती स्पर्धादेखील भरविल्या जात आहेत. त्यामुळे या खेळाने एक वेगळी उंची निर्माण केली आहे.

अलिबाग तालुक्यातील महावीर ग्रामस्थ मंडळ आयोजित यंदाही नागपंचमी निमित्त खंडाळेमध्ये कुस्ती स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धा पाहण्यासाठी कुस्ती प्रेमींनी प्रचंड गर्दी केली होती. संपुर्ण परिसर मल्लांसह क्रीडा प्रेमींनी गजबजून गेला होता.

या स्पर्धेमध्ये पनवेलमधील जय हनुमान तालीम संघ, भाईंदरमधील श्री गणेश आखाडा, आंदोशीमधील शिवाजी व्यायाम शाळा, वाडगाव येथील जय हनुमान तालीम संघ, मांडवामधील टाकादेवी स्पोर्ट्स क्लब, डोंबिवलीतील जय हनुमान तालीम संघ, आवास येथील कारभैरव आखाडा, वळवलीमधील द्वारकाधीश व्यायाम शाळा आणि पनवेलमधील शिवथर येथील जय हनुमान तालीम संघ आदी आखाड्यातील २५० हून अधिक मल्लांनी सहभाग घेतला.

यामध्ये दहा कुस्तीगीर महिला मल्लांचा सहभाग होता. दुपारपासून सुरू झालेल्या या कुस्ती स्पर्धांमध्ये खेळण्याचा आणि स्पर्धा पाहण्याचा आनंद उपस्थितांनी मनमुरादपणे लुटला. या स्पर्धेत प्रथम, द्वितीय ,तृतीय व चतुर्थ क्रमांक पटकावणाऱ्या आखाड्याला आकर्षक चषक दिले जाणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

# रोहित शर्मा भाकरी फिरवण्याच्या तयारीत?

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय क्रिकेट संघ आता पुढील एकदिवसीय मालिका फेब्रुवारी २०२५ मध्ये इंग्लंड विरुद्ध खेळणार आहे. त्यानंतर आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी होणार आहे. भारत चॅम्पियन्स ट्रॉफी पूर्वी केवळ तीन एकदिवसीय सामने खेळणार आहे. यामुळं रोहित शर्मा आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्यापुढं मोठं आव्हान असणार आहे. यामुळं चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकण्यासाठी रोहित शर्मा भारतीय संघात मोठे बदल करण्याची शक्यता आहे.

रोहित शर्मासोबत एकदिवसीय सामन्यात भारताच्या डावाची सुरुवात सध्या शुभमन गिल करत आहे. श्रीलंकेविरुद्धच्या मालिकेत शुभमन गिल सलामीवीर म्हणून अपयशी ठरला आहे. चॅम्पियन्स ट्राफीपूर्वी भारतीय संघ केवळ तीन सामने खेळणार आहे.



यामुळं आगामी काळात सलामीवीर म्हणून यशस्वी जयस्वालला देखील संधी दिली जाऊ शकते. यशस्वी जयस्वाल २०२४ मधील आक्रमक आणि यशस्वी क्रिकेटपटू आहे.

भारताच्या संघात अष्टपैलू खेळाडू म्हणून आगामी काळात रोहित शर्मा वॉशिंग्टन सुंदर आणि रियान परागला अधिक संधी देऊ शकतो. हार्दिक पांड्याच्या फिटनेसचा प्रश्न असल्यानं नुकतीच त्यानं श्रीलंकेविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतून माघार घेतली होती. पुढील काळात भारतीय संघात वॉशिंग्टन सुंदर, रियान पराग आणि शिवम दुबे यांचा अष्टपैलू खेळाडू म्हणून संघात समावेश करण्यात येऊ शकतो. शिवम दुबे, वॉशिंग्टन सुंदर आणि रियान पराग यांना अधिक संधी दिली जाऊ शकते.

# अबुधाबी टी-१० क्रिकेट लीगमध्ये गैरप्रकार करणं भोवलं

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं बुधवारी मोठा निर्णय घेतला आहे. २०२१ मध्ये झालेल्या अबु धाबी टी-१० लीगमध्ये गैरप्रकार केल्यामुळं तीन भारतीयांवर बंदी घातलीहे. आयसीसीनं ७ ऑगस्टला पुणे डेविल्स संघाचा फलंदाजी प्रशिक्षक अशर झैदी,पुणे डेविल्सचे सहसंघमालक पराग संघवी आणि कृष्णकुमार कृष्णकुमार चौधरी यांच्यावर बंदी घालण्याचा निर्णय आयसीसीनं घेतला आहे.

अशर झैदी मूळचे कराचीतील असून त्यांनी ब्रिटनचं नागरिकत्व घेतलेलं आहे. अशर झैदी यांनी इंग्लंडमधील लीगमध्ये क्रिकेट खेळलं होतं. आयसीसीनं अबु धाबी टी १० लीगमध्ये गैरप्रकार केल्यानं अशर झैदींवर ५ वर्षांची बंदी घातली आहे.संघवी आणि चौधरी यांच्यावर दोन वर्षांची बंदी घालण्यात आलेली आहे. संघवी आणि चौधरी यांनी अमिराती क्रिकेट बोर्डाच्या भ्रष्टाचार विरोधी नियमांचं उल्लंघन केल्यानं दोन वर्षांची बंदी घालण्यात आली आहे. आयसीसीनं अमिरात क्रिकेट बोर्डाच्यावतीनं सप्टेंबर २०२३ मध्ये ८ जणांवर दोषारोप ठेवण्यात आला होता. त्यामध्ये अशर झैदी, संघवी आणि चौधरी यांचादेखील समावेश होता. आयसीसीनं ही कारवाई २०२१ मध्ये झालेल्या अबु धाबी टी २० क्रिकेट लीग मधील गैरप्रकाराबद्दल केलेली आहे.

आयसीसीकडून वेळोवेळी क्रिकेटमध्ये गैरप्रकार करणाऱ्यांवर कारवाई केली जाते. मॅच फिक्सिंग, स्पॉट फिक्सिंग सारखी कृती केल्यास आयसीसीकडून संबंधित खेळाडूंवर अनेकदा संपूर्ण काळासाठी बंदी घातली जाते.

### आयसीसीकडून पुणे डेविल्सच्या तिघांवर बंदी

**झैदीवर बंदी**

**अशर झैदी, पराग संघवी आणि कृष्णकुमार चौधरी यांच्यावर १९ सप्टेंबर २०२३ पासून बंदी लागू करण्यात आलेली आहे. आयसीसीच्या नियमांनुसार संघवी आणि चौधरी यांच्यावर घालण्यात आलेल्या बंदीबाबत विचार करुन त्यांना १९ सप्टेंबर २०२४ पासून ते क्रिकेटविषयक कामकाज सुरु करु शकतात. तर, दुसरीकडे अशर झैदी यांच्यावरील बंदीचा कार्यकाळ १९ स्प्टेंबर २०२७ पर्यंत लागू असणार आहे.**

# शाहीनला पदावरून हटवले

**लाहोर:** पाकिस्तान विरुद्ध बांग्लादेश यांच्यात दोन सामन्यांच्या कसोटी मालिका खेळवली जाणार आहे. ज्यासाठी पाकिस्तान क्रिकेट बोर्डने संघाची घोषणा केली आहे. पाकिस्तान संघ शान मसूदच्या नेतृत्वाखाली बांग्लादेश विरुद्ध खेळेल. पीसीबाने मात्र या दरम्यान वेगवान गोलंदाज शाहिनला मोठा धक्का दिला आहे. शाहिनला संघाच्या उपकर्णधार पदावरुन हटवले आहे. त्याच्या जागी पाकिस्तानने सौद शकीलकडे जबाबदारी सोपवली आहे.पाकिस्तान संघाचे अनेक खेळाडू नुकतेच वादात सापडले.

# सुवर्णपदकामुळे पाकिस्तान भारताच्या पुढे

## अमेरिका अव्वल, चीन दुसऱ्या तर भारत ६४ व्या स्थानी

**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**

ऑलिम्पिक २०२४ आता शेवटच्या टप्प्यात आहे. सर्व देशांतील खेळाडू एकमेकांना मागे टाकण्याचा प्रयत्न करत आहेत. दरम्यान, पदकतालिकेतही सातत्याने बदल होताना दिसत आहेत. मात्र, आता फार कमी इव्हेंट शिल्लक आहेत. त्यामुळे यापुढे पदकतालिकेत फारसा बदल होण्याची शक्यता नाही. सध्या पदकतालिकेत अमेरिका अव्वल स्थानी आहे, तर चीन दुसऱ्यास्थानी असून भारत ६४ व्या क्रमांकावर आहे. सुवर्णपदाकामुळे पाकिस्तान भारताच्या पुढे राहिला आहे. तो ५३ व्या स्थानावर आहे.

अमेरिका अव्वल स्थानावर कायम आहे. यंदाच्या ऑलिम्पिकमध्ये अमेरिकेने आतापर्यंत १०३ पदके जिंकली आहेत. यूएसए हा एकमेव देश आहे ज्याने १०० हून अधिक पदके जिंकली आहेत. यूएसएकडे ३० सुवर्ण, ३८ रौप्य आणि ३५ कांस्य पदके आहेत. यात अजून वाढ होण्याची शक्यता आहे. यानंतर चीन दुसऱ्या क्रमांकावर आहे. चीनने ७३ पदके जिंकली आहेत. चीनने आतापर्यंत २९ सुवर्ण, २५ रौप्य आणि १९ कांस्यपदके जिंकली आहेत.

यंदाच्या ऑलिम्पिकमध्ये भारताने आतापर्यंत एकूण ५ पदके जिंकली आहेत. सुरुवातीलाच नेमबाजीत ३ पदके आली होती. यानंतर यावेळी पदकांची संख्या चांगली असेल, असे वाटत होते, पण तसे होऊ शकले नाही. ८ ऑगस्टला भारतीय हॉकी संघाने स्पेनचा पराभव करत कांस्यपदक पटकावले. यानंतर रात्री उशिरा नीरज चोप्राने भालाफेकमध्ये रौप्य पदक जिंकले. म्हणजे एकाच दिवशी दोन पदके आली आहेत.

# मीराबाईचे पदक हुकले

**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारतीय वेटलिफ्टर मीराबाई चानूला पदक जिंकण्यात अपयश आले. वेटलिफ्टिंगच्या ४९ किलो गटात ती चौथ्या स्थानावर राहिली. भारतीय ऑलिम्पिक संघटनेने या कार्यक्रमानंतर एक व्हिडिओ जारी केला. ज्यात मीराबाई म्हणाली की, मी माझ्याकडून सर्वोत्तम प्रयत्न केला, पण पदक निसटले. पुढच्या वेळी मी आणखी मेहनत करेन.

टोकियोच्या रौप्यपदक विजेत्या मीराबाईने दक्षिण पॅरिस एरिना येथे एकूण १९० किलो वजन उचलले आणि चौथे स्थान पटकावले. चीनच्या हु जिहुईने २०६ किलो वजन उचलून ऑलिम्पिक विक्रमासह सुवर्णपदक जिंकले.

रोमानियाच्या मिहाएला व्हॅलेंटिनाने (२०५ किलो) रौप्य आणि थायलंडच्या खांबाओ सुलोचनाने २०० किलो वजन उचलून कांस्यपदक जिंकले.

मीराबाई चानूने एकूण १९९ किलोसह चौथे स्थान पटकावले. मीराबाई चानूने स्नॅच फेरीत पहिल्याच प्रयत्नात ८५ किलो वजन उचलून स्पर्धेची शानदार सुरुवात केली. मात्र, दुसऱ्या प्रयत्नात तिला ८८ किलो वजन उचलता आले नाही, मात्र तिसऱ्या प्रयत्नात तिने हे वजन यशस्वीपणे उचलले. मीराबाईला क्लीन अँड जर्कच्या पहिल्या प्रयत्नात १११ किलो वजन उचलण्यात अपयश आले.

# राफेल नदालची यूएस ओपनमधून माघार

**। स्पेन । वृत्तसंस्था ।**

स्टार टेनिसपटू राफेल नदालने यूएस ओपन २०२४ मधून माघार घेतली आहे. सोशल मीडिया पोस्टद्वारे त्याने चाहत्यांना ही माहिती दिली.

यूएस ओपनचा हंगाम २६ ऑगस्टपासून सुरू होत आहे. त्याचा अंतिम सामना ८ सप्टेंबरला होणार आहे. राफेल नदालने ही माहिती दिली आहे.



नदालने ट्विट केले की, मी आज तुम्हाला हे कळवण्यासाठी लिहित आहे की मी या वर्षीच्या यूएस ओपनमध्ये भाग न घेण्याचा निर्णय घेतला आहे, जिथे माझ्या अद्भुत आठवणी आहेत. न्यूयॉर्कमधील ॲशमधील त्या अद्भुत आणि विशेष रात्री मी मिस करेन, परंतु मला वाटत नाही की यावेळी मी माझे १०० टक्के देऊ शकेन.

तुम्हा सर्वांची आठवण येईल आणि पुन्हा कधीतरी भेटू. माझा पुढील कार्यक्रम बर्लिनमधील लेव्हर कप असेल.नदालने २०१०, २०१३, २०१७ आणि २०१९ मध्ये चार वेळा यूएस ओपन जिंकली आहे. त्याने आतापर्यंत २२ ग्रँडस्लॅम जिंकले आहेत. ज्यामध्ये जास्तीत जास्त १४ फ्रेंच ओपन विजेतेपदांचा समावेश आहे.

## पाकिस्तानच्या अर्शदचा सुवर्णफेक

# भारताच्या निरजला रौप्यपदक

**। पॅरिस । वृत्तसंस्था।**

**पाकिस्तानच्या अर्शद नदीम ने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भालाफेक प्रकारात ९२.९७ मीटर अंतरावर भाला फेकून ऑलिम्पिक विक्रम नोंदवला आणि दिमाखात सुवर्णपदक पटकावले. हे करताना त्याने भारताचा टोक्यो ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता नीरज चोप्रा याला मात दिली. नीरजने ८९.४५ मीटर अंतरावर भाला फेकला मात्र, त्याला सुवर्णपदकावर समाधान मानावे लागले.**



अर्शद नदीमची पॅरिसमधील कामगिरी थक्क करणारी होती. त्याने दोन वेळा ९० मीटरपलीकडे भाला फेकून दाखवला. अशी कामगिरी ऑलिम्पिक अंतिम फेरीत करणारा तो पहिलाच खेळाडू. सुरुवातीच्या प्रयत्नातच त्याने ९२.९७ मीटरवर भाला फेकून ऑलिम्पिक विक्रमाची नोंद केली. त्यानंतर शेवटच्या प्रयत्नातही ९१.७९ मीटरवर भाला फेकला. तो दिवस नीरज चोप्राचा नव्हताच. सहापैकी त्याचे पाच प्रयत्न ङ्गस्टेपिंग मार्कफ ओलांडल्यामुळे फाऊल ठरवण्यात आले. त्यामुळे नदीमसमोर जिंकण्यासाठी सर्वोत्तम कामगिरी करणेच आवश्यक होते आणि ते नीरज-ला जमले नाही. संपूर्ण अंतिम फेरीत एकट्या नदीमलाच ९० मीटरपलीकडे भाला पोहोचवणे जमले. ऑलिम्पिकमध्ये याआधीचा विक्रम नॉर्वेच्या आंद्रेआस थॉरकिल्डसेनने २००८ बीजिंग ऑलिम्पिकमध्ये नोंदवला होता. त्याने ९०.५७ मीटर अंतर नोंदवले होते.

### पहिले वैयक्तिक सुवर्णपदक

अर्शद नदीम हा पाकिस्तानच्या वतीने वैयक्तिक ऑलिम्पिक सुवर्णपदक जिंकणारा पहिला अ‍ॅथलीट ठरला. पाकिस्तानला यापूर्वीची सर्व ऑलिम्पिक सुवर्णपदके हॉकीमध्ये मिळालेली आहेत. १९९२ नंतर पाकिस्तानला ऑलिम्पिकमध्ये पदकप्राप्ती झालेली नव्हती. १९६० रोम ऑलिम्पिकमध्ये पाकिस्तानला हॉकीत सुवर्ण आणि कुस्तीमध्ये कांस्य अशी दोन पदके मिळाली. ते पाकिस्तानसाठीचे आजवरचे सर्वांत यशस्वी ऑलिम्पिक.

### अर्शदची कामगिरी

**२०१६ मध्ये गुवाहाटीमध्ये झालेल्या दक्षिण आशियाई क्रीडा स्पर्धेत त्याला कांस्यपदक मिळाले. २०१८ मध्ये जकार्तामध्ये झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये त्याने कांस्यपदक जिंकले. २०१९मध्ये नेपाळमध्ये झालेल्या दक्षिण आशियाई क्रीडा स्पर्धेत त्याला अखेर सुवर्णपदक मिळाले. दोहामध्ये २०१९मध्ये झालेल्या जागतिक ॲथलेटिक्स स्पर्धेत तो खेळला. २०२० टोक्यो ऑलिम्पिकमध्ये अर्शद उतरला आणि भालाफेक प्रकारात अंतिम फेरीपर्यंत पोहोचला. जागतिक स्पर्धेत उतरणारा आणि ऑलिम्पिक अंतिम फेरी गाठणारा तो पहिला पाकिस्तानी ॲथलीट ठरला. त्या स्पर्धेत तो सातवा आला. पण या काळात ७५ मीटर ते ८० मीटरपर्यंत आणि त्यापलीकडे भाला फेकण्याची त्याची क्षमता सिद्ध झाली होती. अमेरिकेत युजीन येथे २०२२मध्ये झालेल्या जागतिक ॲथलेटिक्स स्पर्धेत तो पाचवा आला. २०२२मधील राष्ट्रकुल स्पर्धेत त्याने सुवर्णपदक पटकावले. हे करताना त्याची मजल प्रथमच ९० मीटरपलीकडे पोहोचली. २०२३ मधील जागतिक स्पर्धेत नदीमने रौप्यपदक पटकावले होते.**


# अफगाणिस्तानच्या खेळाडूना बंदी

नवी दिल्ली : क्रिकेट बोर्डाने युवा खेळाडूला पाच वर्षांसाठी बॅन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या खेळाडूवर मॅच फिक्सिंगचे आरोप असून त्यानेही ते मान्य केले आहेत. हा खेळाडू दुसरा तिसरा कोणी नसून अफगाणिस्तान संघाचा युवा खेळाडू एहसानुल्लाह जनात आहे. अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाने क्रिकेटच्या तिन्ही प्रकारामध्ये त्याच्यावर पाच वर्षांची बंदी घातली आहे. हा खेळाडू काबुल प्रीमियर लीगच्या दुसऱ्या सीझनमध्ये दोषी सापडला होता. अफगाणिस्तानच्या खेळाडूने अँटीकरप्शन कोडचे उल्लंघन केले असून त्याने आरोप स्वीकारले आहेत. एहसानुल्लाह आयसीसीच्या भ्रष्टाचार विरोधी संहितेच्या अनुच्छेदचे उल्लंघन केल्याबद्दल दोषी आढळला. ज्यामध्ये सामन्याचा निकालासह इतर गोष्टींमध्ये समावेश आहे. या मॅच फिक्सिंगमुळे त्याच्यावर क्रिकेटच्या तिन्ही प्रकारांमध्ये बंदी घालण्यात येत आहे.



# झाडांबद्दल जाणून घ्या...

**फन टाईम**



छोट्या दोस्तांनो, 'झाडे लावा, झाडे जगवा' हे वाक्य तुम्ही बरेचदा ऐकलं असेल. झाडं पर्यावरणाची रक्षक असतात. हवेतला कार्बन डाय ऑक्साइड शोषून घेऊन वातावरणात ऑक्सिजन सोडण्याचं महत्त्वाचं काम झाडं करतात. म्हणूनच जास्तीत जास्त झाडं लावायला हवी. झाडांबद्दल सगळं काही जाणून घ्यायचं असेल तर www.treetures.com या साईटला भेट द्या. या साईटवर झाडांशी संबंधित सगळी माहिती उपलब्ध आहे. या साईटचं होमपेज खूप आकर्षक आहे. या होमपेजवर तुम्हाला वेगवेगळी पात्रं दिसतील. त्यावर क्लिक केलं की झाडाच्या प्रत्येक भागाची माहिती मिळू शकेल. या साईटवर रंजक माहितीही आहे. झाडांबद्दलचं ज्ञान वाढवण्यासाठी ही साईट उपयुक्त ठरू शकेल.

झाडं कशी लावायची, त्यांचं संवर्धन कसं करायचं हे सगळं या साईटवर आहे. रंग बदलणारी पानं, जंगलांची रचना, वणवा कसा लागतो, झाडं कशी वाढतात, झाडांना कीड कशी लागते हे सगळं यावर आहे. इथे झाडांविषयीचं ज्ञान वाढवणारे गेम्स आहेत. छान छान व्हिडिओ आहेत. चांगल्या आणि वाईट कीटकांची वर्गवारी करण्यात आली आहे. काही कीटक झाडांच्या वाढीला मदत करतात. झाडांचं नुकसान करणारे किडे खातात तर काही कीटक पानं खातात. झाडांची वाढ रोखतात. इथे तुम्ही अशा कीटकांची माहिती मिळवू शकता. मग काय दोस्तांनो, झाडांना वाहिलेल्या या साईटला भेट देणार ना?

# फुलांचा देश नेदरलँड

**सफर देशांची**



नेदरलँड म्हणजे हॉलंड. पश्चिम युरोपमधला हा छोटासा देश आहे. जर्मनी आणि बेल्जियम यांच्या मध्ये हा देश वसला आहे. नेदरलँडच्या उत्तर आणि पश्चिमेला उत्तर समुद्र आहे. ॲमस्टरडॅम ही नेदरलँडची राजधानी. डच ही इथली प्रमुख भाषा आहे. युरोपियन संघातल्या इतर देशांप्रमाणे युरो हे इथलं चलन आहे. उत्तर समुद्राने हॉलंडला नष्ट केलं असतं. पण इथल्या लोकांनी कालवे, धरणं बांधून, भराव घालून समुद्राला आटोक्यात ठेवलं. तसंच नद्यांनाही वेसण घातली. इथल्या डच लोकांनी या सुविधा केल्या नसत्या तर देशाचा ६५ टक्के भूभाग पाण्याखाली गेला असता. हॉलंडमधले लोक सायकलने प्रवास करतात. यामुळे इथे फारसं प्रदूषण नाही. चारचाकी गाड्यांच्या तुलनेत इथे सायकलींची संख्या तीन पटींनी जास्त आहे.

डच लोक जगातल्या इतर लोकांपेक्षा उंच असतात. इथल्या पुरूषांची सरासरी उंची ६ फूट तर महिलांची सरासरी उंची ५.७ फूट इतकी असते. पोषक आहार आणि आरोग्याच्या अत्याधुनिक सोयी–सुविधांमुळे इथले लोक उंच असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. इथे पर्यटनाला प्रोत्साहन दिलं जातं. इथली कला, स्थापत्यकला तसंच फुलं पाहण्यासाठी जगभरातले लोक येतात. ट्युलिप्स इथे मोठ्या प्रमाणावर उमलतात. हॉलंडमध्ये बल्बचं उत्पादन मोठ्या प्रमाणावर होतं.

या देशात युरोपियन संघातल्या कोणत्याही देशापेक्षा लोकसंख्येची घनता जास्त आहे. नेदरलँडने ऊर्जा निर्मितीसाठी पवनचक्क्यांवर भर दिला आहे. या देशात डोंगर नाहीत. नैसर्गिक सीमा नसल्याने शेजारी देशांनी नेदरलँडवर कायम आक्रमण केलं. या देशावर शतकानुशतकं परकीयांचंच राज्य होतं. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जर्मनीने नेदरलँडचा ताबा घेतला होता. तब्बल पाच वर्षं नेदरलँड जर्मन लोकांच्या ताब्यात होता.

# नेल पॉलिशने नक्षीकाम

तुमच्या आईकडे, ताईकडे नेल पॉलिशच्या रंगीबेरंगी बाटल्या असतील. या नेल पॉलिशचा वापर करून तुम्ही भन्नाट कलाकृती साकारू शकता. नेल पॉलिश मार्बलिंग हा प्रकार तुम्ही नक्की ट्राय करा. यासाठी काय करायचं हे पाहु या...

**साहित्य** : रंगीबेरंगी नेल पॉलिश, पसरट ट्रे, पाणी, प्लेन पेपर, नेल पॉलिश रिमूव्हर, प्लास्टिकचे ग्लोव्हज, टूथपिक, पॉपसिकल स्टिक्स इत्यादी.



**कृती**: सर्वात आधी पसरट ट्रेमध्ये पाणी घाला. या पाण्यात कागद बुडायला हवा. कामाला सुरूवात करण्यापूर्वी प्लास्टिकचे ग्लोव्हज असतील घाला. त्यातूनही हातांना नेल पॉलिश लागलं तर ते काढण्यासाठी रिमूव्हरचा वापर करता येईल. आता खरी गंमत आहे

**करून तर पहा**

दोस्तांनो... नेल पॉलिश मार्बलिंग ही भन्नाट कलाकृती आहे. ती करण्यासाठी विविध रंगांचं नेल पॉलिश घ्या. सगळ्या बाटल्या ट्रे मधल्या पाण्यात ओता. ही कृती झटपट करा. आधी फिकट रंगाचं नेल पॉलिश घ्या. मग गडद रंगांची निवड करा. टूथपिकच्या मदतीने नेल पॉलिश पाण्यात पसरवून घ्या. आता पेपर पाण्यात बुडवा. काही सेकंद ठेवा आणि लगेच बाहेर काढा. कागदावर नेल पॉलिशची नक्षी उमटलेली दिसेल. पाण्यावर तरंगणारं नेल पॉलिश पॉपसिकल स्टिकच्या मदतीने बाजूला करा. कागद वाळू द्या. कागदावर उमटलेली रंगीबेरंगी नक्षी खूप छान दिसेल.

# 'इंट्रोव्हर्ट' आहात?

**करा विचार**



छोट्या दोस्तांनो, प्रत्येकाला आयुष्यात काही तरी बनायचं असतं. उत्तम करीअर घडवायचं असतं. आठवी, नववीतल्या मुलांनी भविष्यातल्या योजना केव्हाच ठरवलेल्या असतात. कुणाला डॉक्टर व्हायचं असतं, कुणाला इंजिनिअर तर कुणाची सैन्य दलात जाण्याची इच्छा असते. प्रत्येक क्षेत्रासाठी वेगवेगळ्या कौशल्यांची गरज असते. काही क्षेत्रांमध्ये बोलका स्वभाव कामी येतो पण काहीजण इंट्रोव्हर्ट किंवा आत्मकेंद्री असतात. इतरांमध्ये फारसे मिसळत नाहीत. त्यांच्यावर अबोल असल्याचा शिक्का मारला जातो. यामुळे आत्मविश्वास कमी होतो. पण इंट्रोव्हर्ट किंवा आत्मकेंद्री असणं वाईट किंवा चुकीचं नाही मित्रांनो. तो आपला स्वभाव आहे. पण या स्वभावामुळे आपण मागे पडू असा विचार करण्याची काहीच गरज नाही. तुम्ही इतरांसोबत पटकन मिसळत नाही ही बाब स्वीकारा. यात काहीही चुकीचं नाही हे लक्षात घ्या. आत्मकेंद्री असणं तुमचा अवगुण नाही तर चांगला गुण आहे, असा विचार करा.

✻ तुमच्यातले गुण, कौशल्य ओळखा. या कौशल्यांचा योग्य वापर करा. आपली कौशल्यं वाढवण्याचा प्रयत्न करा.

✻ तुमचा स्वभाव, विचार आणि क्षमता यांचा विचार करून करीअर निवडा. कुणी तरी सल्ला दिलाय म्हणून चुकीचा निर्णय घेऊ नका. करिअर निवडताना आपल्या आवडीचा विचार करा.

✻ अबोल किंवा आत्मकेंद्री स्वभाव वाईट नसला तरी लोकांपासून दूर राहणंही योग्य नाही. आपली मित्रमंडळी, नातेवाईकांसोबत मिसळायला हवं. आपल्या स्वभावात थोडा बदल करण्याचा प्रयत्न करा. व्यक्त होताना घाबरू नका.

✻ खूप बडबड्या लोकांसोबत रहायला, त्यांच्यासोबत जायला आत्मकेंद्री स्वभावाच्या व्यक्ती घाबरतात. बडबड्या लोकांना आकर्षणाचं केंद्र बनायचं असतं. त्यामुळे आपण त्यांच्यापेक्षा कमी आहोत असा विचार मनात आणू नका. शांत स्वभावामुळे तुम्ही लोकांच्या मनात स्थान निर्माण करू शकता. लोकांना आपलंसं करू शकता हे लक्षात घ्या.

# वेगळ्या वाटेवर...

**कोण होणार?**

डॉक्टर, इंजिनिअर, सीए, एमबीए, आयसीडब्ल्यूए यासारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसोबत आता करीअरचे हटके पर्याय निवडण्याचा ट्रेंड आहे. विविध क्षेत्रात उत्तम संधी निर्माण झाल्या आहेत. करीअरची वेगळी वाट निवडणाऱ्यांचं कौतुकही होतं. तुम्हीही करीअरची वेगळी वाट निवडू शकता. वेगळ्या करीअरचे हे काही पर्याय...

✻ इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ कार्पेट टेक्नॉलॉजीमधून तुम्ही कार्पेट टेक्नॉलॉजीचा अभ्यासक्रम पूर्ण करू शकता. हा अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही कापड उद्योगात करीअर करू शकता.



✻ ट्रेकिंग हा धाडसी क्रीडाप्रकार असल्यामुळे त्याचं प्रशिक्षण घ्यावं लागतं. माउंटेनियरिंग किंवा ट्रेकिंग प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही या क्षेत्रात करीअर करू शकता.

✻ मुंबई विद्यापीठासह काही संस्था पपेटरीचं प्रशिक्षण देतात. हा अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही करीअरची वेगळी वाट निवडू शकता.

✻ इंडियन अॅस्ट्रोबायोलॉजी संशोधन संस्थेत अॅस्ट्रोबायोलॉजीचा अभ्यासक्रम पूर्ण करता येईल. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर तुम्ही अंतराळ क्षेत्रात संशोधन करू शकता.

# स्मार्ट छत्री!

**स्मार्ट गॅझेट**



मित्रांनो, पावसाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे आतापर्यंत रेनकोट आणि छत्र्या कपाटातून बाहेर आल्या असतील. जोरात पाऊस आला की छत्री उघडेपर्यंत किंवा रेनकोट घालेपर्यंत आपल्याला भिजायला होतं. अशातच शाओमिच्या स्मार्ट छत्रीची चर्चा होताना दिसत आहे. 'शाओमि' या ब्रॅन्डने खास स्मार्ट छत्री क्राऊडफंडिंग प्लॅटफॉर्म शाओमि युपिनवर आणली आहे. ही छत्री चार्ज केल्यानंतर १८० दिवस चालते असा दावा करण्यात आला आहे. ही वन टच छत्री आहे. या फीचरमुळे ही छत्री दोन सेकंदात उघडते आणि दोन सेकंदात बंददेखील होते. ही छत्री खास अॅल्युमिनियम एलॉय फ्रेमने तयार करण्यात आली आहे, सोसाट्याचा वारा आला तरीही ही छत्री उलट होत नाही. रात्रीच्या पावसात रस्ता दिसावा म्हणून या छत्रीच्या कोपऱ्यांवर लाईट लावण्यात आले आहेत. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये ही छत्री अत्यंत उपयोगी आहे. कारण ती उघडण्यासाठी दोन्ही हातांची गरज नाही. त्यामुळे पाऊस पडत असेल तर ही छत्री तातडीने उघडता येते. कंपनीचा दावा आहे की छत्री चार्ज केल्यानंतर ती १५० वेळा उघडली जाते आणि बंद करता येते. छत्री पूर्ण चार्ज करण्यासाठी दीड तास लागतो. या छत्रीची किंमत १२९ युआन म्हणजेच भारतीय रुपयांमध्ये जवळपास १५०० रुपये इतकी आहे. लॉन्च झाल्यानंतर या छत्रीची किंमत नक्कीच वाढेल. ही किंमत किती असेल, हे अद्याप कंपनीने स्पष्ट केलेलं नाही. पण मित्रांनो, अशी छत्री वापरायला किती मजा येईल ना?

# मैदानात खेळा बिनधास्त

**फिटनेस**

दोस्तांनो, तुम्ही मैदानी खेळ खेळता का? आजच्या स्मार्टफोन, कॉम्प्युटरच्या जमान्यात मैदानी खेळांकडे आपलं जरा दुर्लक्षच होतं, नाही का? छान व्यायाम करायचा तर क्रिकेट, फुटबॉल, खोखो, कबड्डी, बॅडमिंटन, लगोरी असे अनेक खेळ तुम्हाला खेळता येतील. आवडत्या खेळाचं प्रशिक्षणही घेता येईल. पण खेळ खेळायचा म्हटला की आपलं शरीर तंदुरूस्त असलं पाहिजे. शरीर सुदृढ असेल तरच आपण पुढे जाऊ शकतो. दोस्तांनो, प्रत्येक खेळाची पद्धत वेगळी असल्याने फिटनेसही वेगळ्या पद्धतीने राखावा लागतो. प्रत्येक खेळासाठी वेगळ्या अवयवाचा कौशल्याने वापर करावा लागतो. फूटबॉल खेळाताना पायांचा तर टेनिस, बॅडमिंटन यांसारख्या खेळांसाठी हातांचा वापर करावा लागतो. पाय आणि हात बळकट असतील तरच मैदानात आपण चांगली कामगिरी करू शकतो. फुटबॉल खेळताना सतत पळावं लागत असल्याने तुमचा स्टॅमिना टिकून रहावा लागतो. फुटबॉलचा सामना ९० मिनिटांचा असतो. दुसरीकडे क्रिकेटपटूला सात ते आठ तास मैदानावर रहावं लागतं. क्षेत्ररक्षण म्हणजेच फिल्डिंग करताना सतत पळावं लागतं. त्यामुळे त्यांचे स्नायू बळकट असणं गरजेचं असतं. खेळताना सहा ते सात थकवा न येण्यासाठी तंदुरूस्त असावं लागतं. खेळ कोणताही असला तरी तुमचं शरीर लवचिक असणंही तितकंच गरजेचं असतं. शरीर लवचिक असेल तर तुम्ही चेंडू अडवताना झेप घेऊ शकता. फिटनेस राखताना अनेक गोष्टींकडे लक्ष द्यावं लागतं. नियमित व्यायामासोबत आहार–विहार, झोप आणि आसपासच्या वातावरणाचाही आपल्या आरोग्यावर परिणाम होत असतो. आपल्या स्नायूंची क्षमता वाढवावी लागते. हृदय बळकट करावं लागतं. शरीराचा फिटनेस राखून खेळाचा आनंद लुटणं सर्वाधिक महत्त्वाचं आहे.



**जिज्ञासा**

**ओळखा पाहू...**

१) रॉजर फेडरर कोणता खेळ खेळण्यासाठी प्रसिद्ध आहे?
२) पहिली गोलमेज परिषद कधी झाली?
३) 'भीम ॲप' कधी उपलब्ध करून देण्यात आलं?
४) अमेरिकेतल्या स्वातंत्र्यदेवतेच्या पुतळ्याची उंची किती आहे?
५) सौदी अरेबियाची राजधानी कोणती?
६) पाण्याशिवाय सर्वाधिक काळ जगू शकणारा प्राणी कोणता?
७) मोनालिसाचं मूळ चित्र कशावर काढण्यात आलं होतं?
८) हिमालय पर्वतरांगांची लांबी किती आहे?
९) सांभर सरोवर कोणत्या राज्यात आहे?
१०) भारताला किती किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभला आहे?

उत्तर : १) टेनिस २) नोव्हेंबर १९३० ते जानेवारी १९३१ ३) ३० डिसेंबर २०१६ ४) ९३ मीटर ५) रियाध ६) उंदीर ७) लाकडावर ८) २५०० किलोमीटर ९) राजस्थान १०) ६००० किलोमीटर

**ठिपके जुळवा**



# असं मिळतं मानांकन

**स्मार्ट नॉलेज**



दोस्तांनो, 'गुगल' हे जगातलं सर्वोत्तम सर्च इंजिन आहे. इथे एखादी माहिती, बातमी किंवा साईट सर्च करायची असेल तर सर्चबारमध्ये जावं लागतं. या सर्चबारमध्ये तुम्हाला विविध कंपन्या, वेबसाईट्स तसंच बातम्या दिसतात. हे सगळं गुगलच्या पहिल्या पानावर असतं. गुगलच्या पहिल्या पानावर स्थान मिळवण्यासाठी कंपन्या, वेबसाईट्समध्ये चढाओढ असते. कोणत्या साईटला पहिल्या पानावर स्थान द्यायचं हे गुगल ठरवतं. हे ठरवण्याची गुगलची एक पद्धत आहे. गुगल प्रत्येक साईटला मानांकन म्हणजे रँक देतं. या प्रक्रियेला 'अल्गोरिदम' असं म्हटलं जातं. ही प्रक्रिया नेमकी काय आहे याविषयी...

**कसं मिळतं मानांकन?**

सर्वाधिक वाचल्या गेलेल्या किंवा सर्च केल्या गेलेल्या वेबसाईट्स, बातम्या, कंपन्या तसंच इतर बाबींना गुगल पहिल्या पानावर स्थान देतं. कोणती बातमी किंवा साईट किती शेअर केली आहे हे सुद्धा गुगल बघतं.

**क्लिक**

वेबसाईट किंवा माहितीवर करण्यात आलेल्या क्लिकच्या आधारे मानांकन ठरतं. क्लिक जास्त तेवढं मानांकन वर येण्याची शक्यताही जास्त. एखाद्या साईटला मिळणारे क्लिक कमी झाले तर ती साईट दुसऱ्या किंवा तिसऱ्या पानावर जाते.

**बाउंस रेट**

साईटचा बाउंस रेट जास्त असेल तर मानांकन खाली घसरू शकतं. लोकांना साईटवरची माहिती आवडली नाही तर बाउंस रेट वाढतो.

**सरासरी वेळ**

युजरने वेबसाईटवर किती वेळ घालवला किंवा एखादी माहिती किती वेळ वाचली यावरुन गुगल मानांकन ठरवतं.

**कुठून मिळाली माहिती?**

एखाद्या साईटची किंवा वृत्ताची माहिती कुठून मिळाली हे सुद्धा पाहिलं जातं. सोशल मीडिया किंवा थेट गुगलवरून माहिती मिळाली असेल तर नामांकन वर येतं. अन्य मार्गाने माहिती मिळाली असेल तर नामांकन घसरतं.

**चित्र रंगवा**



**खादाडी**

## गारेगार स्मुदी!



थंडी पडू लागली की स्ट्रॉबेरी मिळायला सुरुवात होईल. आंबट गोड चवीची स्ट्रॉबेरी मस्त लागते. या स्ट्रॉबेरीपासून तुम्ही मस्त स्मुदी बनवू शकता. यासाठी आठ ते दहा स्ट्रॉबेरी घ्या. अर्धा कप दूध, अर्धा कप दही, तीन चमचे साखर, दोन छोटे चमचे व्हॅनिला इसेंस आणि बर्फाचे तुकडे असं साहित्य घ्या. आता सगळं साहित्य मिक्सरच्या भांड्यात घाला. फिरवून घ्या. मस्त गारेगार स्मुदी तयार आहे.

**लाईफस्टाईल**

## झोप येत नसेल तर...

रात्रीची झोप प्रत्येकासाठी महत्त्वाची असते. पण बऱ्याच कारणांमुळे रात्री शांत झोप लागत नाही आणि सकाळी खूप त्रास होतो. ताणतणाव, झोपण्याआधी मोबाईलचा वापर, टीव्ही बघणं यामुळे झोप येत नाही. तसंच ताण किंवा काळजी वाटत असेल तरी झोप येत नाही. झोप येत नसेल तर आपण काही उपाय करायला हवे. मुख्य म्हणजे झोपण्याच्या दोन तास आधी जेवायला हवं. तसंच झोपायच्या आधी चहा, कॉफी पिऊ नये. तुम्हालाही झोप येत नसेल तर त्या मागची कारणं शोधून काढा आणि योग्य तो उपाय करा.

**योगा टाईम**

## गणेश मुद्रा

आत्मविश्वास वाढवण्यासाठी तुम्ही गणेश मुद्रा करू शकता. ही मुद्रा करताना हातांचा योग्य प्रकारे वापर करावा लागतो. ही मुद्रा नियमितपणे केल्याने फुफ्फुसं बळकट होतात. तुमच्यात आत्मविश्वासाची कमतरता असेल तर गणेश मुद्रा करता येईल.



**दोस्त हे मस्त**

## पिग्मी हॉग

जंगली डुकरांच्या कुटुंबातला एक प्राणी म्हणजे पिग्मी हॉग. आकाराने छोटं असं हे डुक्कर आहे. पुढच्या दहा वर्षांमध्ये हा प्राणी नामशेष होणार असल्याचं सांगितलं जातं. त्यामुळे पिग्मी हॉगला वाचवण्याचे प्रयत्न सुरू आहे. हिमालयाच्या पायथ्याशी तो आढळतो.








# अण्णाभाऊ साठे

## साहित्य आणि चित्रपट


**तुकाराम रामभाऊ साठे उर्फ आण्णा भाऊ साठे ते मराठीतील थोर साहित्यिक समाजसुधारक, लोककवी, लेखक होते. त्यांचे लेखन सामाजिक व राजकीयदृष्ट्या कृतीशिलतेवर आधार केले होते. ते हिंदू धर्मातील मातंग समाजात जन्मले होते. सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव या गावी त्यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी झाला. त्यांच्या जयंतीचा कार्यक्रम ठिकठिकाणी होत असून त्यांच्या कार्याच्या स्मृती जागविल्या जात आहेत. ते मार्क्सवादी विचारसरणीचे होते. सुरुवातीला त्यांच्यावर साम्यवादी विचारसरणीचा प्रभाव होता. दलित साहित्याचे संस्थापक म्हणूनही त्यांना श्रेय दिले जाते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतही त्यांनी भाग घेतला होता.**

**शरद कोरडे**

आण्णाभाऊंचे शालेय शिक्षण फारच अल्प प्रमाणात झाले होते. अक्षरओळख होण्यापुरते ते प्राथमिक शाळेत गेले होते. पण तेथेही रमले नाहीत, जातीजातीतील भेदभावामुळे त्यांनी शाळा सोडली. दारिद्र्य आणि उपासमार यामुळे त्यांनी कुटूंबासह मुंबईचा रस्ता धरला. वाटेगाव ते मुंबई हे अंतर त्यांनी दिवसेंदिवस पायी चालत पार केले. मुंबईतील 'माटुंगा लेबर कँप' या दलित व शोषितांच्या वस्तीत त्यांना आसरा मिळाला. या वस्तीत शाहीर अमरशेख व शाहीर कॉम्रेड गव्हाणकर यांचे नेहमी येणे होत असे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी लाल बावटा कलापथकाची स्थापना केली. त्यावेळचे कम्युनिस्ट नेते कॉ.आर.बी. मोरे, के.एम. साळवी, शंकर नारायण पगारे यांच्यासोबत आण्णाभाऊंनी कम्युनिस्ट पक्षाचे काम करण्यास सुरूवातत केली. या काळात अण्णाभाऊंनी आपल्या लिखाणास सुरूवात केली. कॉ.स.ह. मोडक यांच्या लोकसाहित्य प्रकाशन व कॉ.वा.वि. भट यांच्या अभिनव प्रकाशनने त्यांच्या कादंबऱ्या, कथासंग्रह व लोकनाट्ये प्रकाशित करून ते जनमानसात पोहोचविण्याचे भरीव कार्य केले. अण्णांच्या 'शाहीर' या पुस्तकास कॉ. श्रीपाद डांगे यांनी प्रस्तावना लिहून त्यांचा गौरव केला. त्यांच्या 'इमानदार' या नाटकाचा हिंदी प्रयोग इंडियन पिपल्स थिएटर असोसिएशन (इप्टा) या संस्थेचे सिने अभिनेते बलराज साहनी यांच्या सहाय्याने सादर झाला. पुढे अण्णाभाऊंना इष्टाचे अखिल भारतीय अध्यक्षपदही मिळाले.

आण्णाभाऊ साठे हे बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिकवणूकीला अनुसरून दलित चळवळीकडे वळले. दलित व कामगार यांच्या जीवनातील अनुभवांना प्रकट करण्यासाठी त्यांनी कथा लिहिल्या. १९५८ मध्ये मुंबईत स्थापन केलेल्या पहिल्या दलित साहित्य संमेलनाचे उद्घाटन करताना त्यांनी 'पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरलेली नसून ती दलित व कामगार वर्गाचे तळहातावर तरलेली आहे. असे उद्गार त्यांनी काढले. अण्णाभाऊ यांनी मराठीत ३५ कादंबऱ्या, १४ लोकनाट्ये, १५ लघुकथा संग्रह, काही नाटके, ११ पोवाडे व शेकडो लावण्या, १२ चित्रपट पटकथा लिहिल्या. त्यांची मुंबईची लावणी खूप गाजली. मुंबईमधील दुर्व्यवहार, शोषण, असमानता व अन्याय यावर त्यातून प्रकाश टाकला होता. त्यांची 'माझी मैना गावावर राहिली' ही छक्कड लावणी अनेक कार्यक्रमांतून गायली जायची. अण्णाभाऊ यांच्या एकूण सर्वच साहित्यावर व त्यांच्या जीवनावर एकूण १२ पुस्तके प्रकाशित झाली. त्यात बाबूराव गुरव, रतनलाल शोनाग्रा (हिंदीमध्ये) डॉ. संजीवनी पाटील, विजयकुमार जोखे, विठ्ठल साठे, डॉ. आंबादास सगर, डॉ. श्रीपाद सबनीस, प्रा. गौतम निकम, ॲड. महेंद्र साठे आदी लेखकांचा समावेश आहे. आपल्या स्वतःच्या साहित्य कृतीबद्दल बोलताना अण्णाभाऊ म्हणतात 'मी जे स्वतः जगलेलो आहे व अनुभवलेले आहे, तेच मी शब्दात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. माझ्या साहित्यातील बऱ्याच व्यक्तिरेखा मला भेटलेल्या आहेत. माटुंग्यातील कामगार कँपमध्ये व घाटकोपरच्या चिरानगर झोपडपट्टीत मला माझ्या कथेतील अनेक नायक मी प्रत्यक्षात पाहिले आहेत. अण्णाभाऊ साठे यांनी एकूण ३५ कादंबऱ्या लिहिल्या असल्या तरी त्यातील कादंबऱ्यांवर मराठी चित्रपट निघाले आहेत. 'वैजयंता' या त्यांच्या कादंबरीवर प्रथम रेखा फिल्मचे मालक गजानन जहागीरदार व भास्करराव कुलकर्णी यांनी त्याच नावाच्या चित्रपटाची निर्मिती केली. गजरा नावाच्या कलावंतीणीची मुलगी वैजयंता ही खूप शिक्षण घेऊन सुशिक्षीत होते. आपल्या कुळाची प्रतिष्ठा वाढवते. आपल्या मुलीने तमाशाच्या व्यवसायात न पडता चांगल्या घरची सून होऊन सन्मानाने जगावे अशी गजराची इच्छा असते. ज्योतिबा पाटलांचा मुलगा उमा तिला जावई म्हणून पसंत असतो. पण ज्योतिबाचा या लग्नास विरोध असतो. गजराच्या तमाशा फडातील चंद्रा फड सोडून निघून गेल्याने त्याजागी नाईलाजाने वैजंयता हिला उभे राहावे लागते. पुढे वैजयंताच्या मार्गात अनेक अडचणी येतात, तरीही शेवटी वैजयंता व उमा यांचे लग्न होते. अशा कथेवरील या चित्रपटाचे दिग्दर्शन गजानन जहागीरदार यांनी केले होते. त्यात अरूण सरनाईक, जयश्री गडकर, रत्नमाला, लिला गांधी, सूर्यकांत, दत्तोपंत आंग्रे व गजानन जहागीरदार हे कलाकार होते. या चित्रपटाची पटकथा व संवाद व्यंकटेश माडगूळकर यांनी तर गीते ग.दि. माडगूळकर यांनी लिहिली होती, संगीत वसंत पवारांचे होते. या चित्रपटाला रसिकांनी मोलाची दाद दिल्याने तो यशस्वी १९९३ साली आण्णाभाऊंच्या दोन कादंबऱ्यांवर दोन चित्रपट तयार करण्यात आले. त्यात 'फकिरा' व 'डोंगरची मैना' या चित्रपटांचा समावेश आहे. त्यात मातंग समाजातला तरूण 'फकिरा' हा तरूण पडलेल्या भीषण दुष्काळात ब्रिटीशांचे खजिने लुटून ती रक्कम भुक्या प्यास्या गरीबांना व दलितांना वाटत असते. ब्रिटीशांनी त्याची दहशत घेतली असते. शेवटी इंग्रज सरकारने गुन्हेगार जमातीचा दुष्ट कायदा त्याच्यावर लादला व त्याला पकडण्यासाठी सापळा लावला व फसवून त्याला अटक केली. असे कथानक असलेल्या या चित्रपटाची निर्मिती कॉ.द.ना. गव्हाणकर यांनी केली व कुमार चंद्रशेखर यांनी त्याचे दिग्दर्शन केले. इष्टाचे ख्यातनाम साहित्यिक के.अे. अब्बास यांनी या चित्रपटाची पटकथा लिहिली होती. इष्टामधील सर्व साहित्यिक व कम्युनिस्ट पक्षाचे अनेक कार्यकर्ते या चित्रपटाच्या निर्मितीत सहभागी झाले होते. ग.दि. माडगूळकर यांनी गीते लिहिली होती. या चित्रपटात जयराज, धुमाळ, सूर्यकांत, वंदना, सुलोचना, जयशंकर दानवे, डेव्हिड व रणजीत बुधकर यांनी भूमिका केल्या होत्या. हा चित्रपट तुफान गाजला होता. यावर्षी आण्णांच्या 'माकडीचा माळ' या कादंबरीवर 'डोंगरची मैना' हा चित्रपट नामवंत निर्माते व दिग्दर्शक अनंत माने यांनी तयार केला. भटक्या विमुक्त समाजाच्या जीवनपद्धतीचे अतिशय सुक्ष्म चित्रीकरण करण्यात आले होते. या चित्रपटात अरूण सरनाईक, जयश्री गडकर, चित्रा जयशंकर दानवे, दादा साळवी, राम नगरकर, गुलाब मोकाशी आदी कलावंत होते. यातील गीते जगदीश खेबुडकर यांनी लिहिली असून संगीत राम कदम यांनी दिले होते.

आण्णाभाऊंच्या १९६९ सालच्या 'आवडी' या कादंबरीवरून त्याचवर्षी निर्माते, दिग्दर्शक वसंत पेंटर यांनी 'टिळा लाविते मी रक्ताचा' या चित्रपटाची निर्मिती केली. यात तांदुळवाडीच्या आबा सावंताचा मुलगा नागोजी हा बारा वर्षाची सजा भोगून तुरूंगातून सुटून बाहेर येतो. जीवा रामोशी त्याची वाट पाहत आडवाटेला बसलेला असतो. नागोजीला त्याचे वडील आबा घरात घेत नाहीत. कारण त्याने त्याची बहीण आवडीचा कुऱ्हाडीने खून केलेला असतो. जीवा आवडीवर प्रेम करीत असतो. तो नागोजीचा पाठलाग करतो व ज्या ठिकाणी त्याने आवडीला मारले असते त्याच ठिकाणी जीवा नागोजीवर कुऱ्हाडीने हल्ला करतो व त्याचा प्राण घेतो. या कथानकावर आधारीत या चित्रपटाची पटकथा व गीते जगदीश खेबुडकर यांनी लिहीली असून संगीत राम कदम यांनी दिले आहे. या चित्रपटात सूर्यकांत, जयश्री गडकर, मधु गायकवाड, माणिकराज, राजशेखर, शांता तांबे व पुष्पा भोसले यांनी भूमिका केल्या होत्या. अण्णाभाऊंच्या चिखलांतील कमल या कादंबरीवरून दत्ताराम गायकवाड यांनी १९६९ साली 'मुरली मल्हारी रायाची' हा चित्रपट निर्मआण केला. या चित्रपटाचे दिग्दर्शन गोविंद कुलकर्णी यांनी केले व गीते जगदीश खेबुडकर यांनी लिहिली होती. यात बळी नामक पाटलांचा मुलगा सीता या मुरलीवर प्रेम करीत असतो पण मुरलीचा जन्म हा देवच्या पूजेसाठी आणि नृत्यासाठी झालेला असतो. या रूढीमुळे त्यांच्या प्रेमात अडचणी येतात, तिला पारंपारिक प्रथेत अडकवून पाटील मंडळी त्याचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न करतात. असे कथानक असलेल्या या चित्रपटात कृष्णकांत दळवी, जयश्री गडकर, चित्तरंजन कोल्हटकर, सूर्यकांत व रत्नमाला यांनी भूमिका केल्या होत्या. १९७० साली अण्णांच्या 'वारणेचा वाघ' या कादंबरीवरून दिग्दर्शक वसंत पेंटर यांनी चित्रपट निर्माण केला. या चित्रपटांतील जगदीश खेबुडकर यांच्या गीतांना राम कदम यांनी संगीतबद्ध केले होते. या चित्रपटात सूर्यकांत, सुशीला, राजशेखर, माणिकराज, चित्रा, पुष्पा भोसले व वर्षा यांनी भूमिका केल्या होत्या. हा चित्रपट प्रचंड गाजला. राजू भोसला नामक तरूणाने ब्रिटीशांशी दिलेल्या लढ्याचे यात चित्रण करण्यात आले होते. त्यानंतर अण्णाभाऊ यांच्या 'अलगूज' या कादंबरीवरून 'अशी ही साताऱ्याची तऱ्हा' हा चित्रपट मुरलीधर यांनी दिग्दर्शित केला. या चित्रपटात अरूण सरनाईक, उमा माणिकराज, सरोज सुखटणकर, बच्चीबहाद्दूर आदी कलाकार होते. हा चित्रपटही यशस्वी ठरला. अण्णाभाऊंच्या कादंबरीतील वास्तववाद, गरीब कामगारांचे शोषण, नायकाचा बेडर रांगडेपणा, नद्या, डोंगर व वने यांनी नटलेला निसर्ग व घटनांमधील वास्तवता यामुळे हे चित्रपट अधिक लोकप्रिय झाले. अण्णाभाऊंच्या लेखणीतील प्रतिभेपुढे आपण कायम नतमस्तक होतो. ●●



## माजी लष्करप्रमुख
# अरुणकुमार वैद्य यांचा स्मृतिदिन



**भारताचे माजी लष्करप्रमुख तथा अलिबागचे सुपुत्र जनरल अरुणकुमार वैद्य यांनी शीखीस्तान चळवळ नेस्तनाबूत केली. त्यसाठी अमृतसर येथील सुवर्ण मंदिरात ऑपरेशन ब्ल्यूस्टार करावे लागले. म्हणून ते (शीख) अतिरेक्यांच्या हिटलिस्टमध्ये गेले. आणि अतिरेक्यांकडून ते दि.१० ऑगस्ट १९८६ रोजी ''शहीद'' झाले. त्यांचा १० ऑगस्ट २०२४ रोजी ३८ वा स्मृतिदिन आहे.**

वैद्य कुटुंब मूळ अलिबागचे. त्यांचे वडील श्रीधरपंत (I.C.S) जिल्हाधिकारी हे अत्युच्च पद भूषवित होते. अलिबाग येथेही ते जिल्हाधिकारी होते. स्वतःच्या जिल्ह्यात सनदी अधिकारी म्हणून काम करणे जिकिरीचे असते. पण शालीन, सच्छील व निःपक्षपाती तसेच कामात तरबेज असलेल्या श्रीधरपंतांना कोणतीच अडचण भासली नाही. सनदी अधिकाऱ्यांच्या सतत बदल्या होत असतात. सततच्या बदल्यांमुळे अरुणकुमारांचे शिक्षण अलिबाग, मुंबई, सुरत व पुणे येथे झाले. प्रखर बुद्धी, अफाट स्मरणशक्ती व अचूक निर्णयक्षमता असलेल्या अरुणकुमारांनी पिताश्रींचा वारसा चालविण्यासाठी सनदी अधिकारी बनून निर्धास्तपणे मानम रातब मिळावा अशी इच्छा आई-वडिलांची होती. पण मळलेल्या वाटेने प्रवास करणे अरुणकुमारांच्या रक्तात नव्हते. रणरणते ऊन, कडाक्याची थंडी, बर्फ व मुसळधार पाऊस यांच्याशी सामना करण्यासाठी ते लष्करात दाखल झाले. शिस्तीचा भोक्ता, अचूक निर्णयक्षमता, प्रसंगावधानता, कमालीची तडफ, विश्वासार्हता, मनोधैर्य, चिकाटी व कार्यक्षमतेमुळे ते लष्करात रुळले. अथक प्रयत्नामुळे त्यांना बढत्याही मिळत गेल्या. रक्तात भिनलेली राष्ट्रीयवृत्ती व सचोटीमुळे महावीर चक्र, अतिविशिष्ट सेवापदक दुसरे महावीरचक्र इ, पदकांचे ते मानकरी ठरले. त्यांची निर्णयक्षमता व कार्यक्षमता पाहून भूसेनाप्रमुख (चीफ ऑफ द आर्मी) या सर्वोच्चपदी त्यांची १ ऑगस्ट १९८३ रोजी नियुक्ती झाली. हा सरखेल कान्होजी राजांच्या कुलाब्याचा व अलिबागकरांचा सन्मान आहे.

### इंडस्ट्रियल हायस्कूलला ''कृतज्ञता'' भेट

भूसेनाप्रमुख हे लष्करामधील सर्वोच्च पद भूषवित असल्यामुळे वैद्य साहेबांची जबाबदारी वाढली. 'ऑपरेशन ब्ल्यूस्टार' यशस्वी झाल्यामुळे लष्करातील कर्तबगार अधिकारी म्हणून त्यांची ख्याती झाली. परंतु विशेष कर्तबगारी अनेकदा जिवावर बेतते. एकीकडे ते अतिरेक्यांच्या हिटलिस्टवर असल्यामुळे निनावी पत्रे येत होती. तसेच अज्ञातांकडून धमकीचे फोन येत असल्यामुळे त्यांची बेचैनी वाढली होती. तरीही ज्या मातृभूमीमधील शाळेत आपण शिकलो, मैदानी खेळ खेळलो, कडक शिस्तीचे धडे घेतले म्हणून लष्करप्रमुख पदापर्यंत पोचलो त्या इंडस्ट्रियल हायस्कूलची तसेच मातृभूमी असलेल्या अलिबाग शहराची ओढ लागली होती. खरे पाहता इंडस्ट्रियल हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांस भारताचा लष्कर प्रमुख हे सर्वोच्च पद शाळेच्या मुख्याध्यापकांना पत्राद्वारे दि. २९/८/१९८५ रोजी इंडस्ट्रियल हायस्कूलला सदिच्छा भेट देत असल्याचे कळविले. नियोजित कार्यक्रम फक्त १७ मिनिटांचा होता. त्यावेळी अलिबाग शहराला लष्कराच्या छावणीचे स्वरूप आले होते. प्रारंभी को.ए.सो. चे कार्याध्यक्ष ॲड. दत्ता पाटील यांनी स्वागत केल्यानंतर माजी विद्यार्थी तथा देशाचे लष्करप्रमुख जनरल वैद्य शाळेच्या जुन्या आठवणी सांगताना गहिवरले. त्यांचा कंठ दाटून आला. ते म्हणाले, ''या शाळेने मला शिस्तीचे, व्यायामाचे व वेळेचे महत्त्व शिकविले. कारपेंटरीचे धडे याच शाळेत मी गिरविले. त्या शिदोरीवर मी देशाच्या लष्करप्रमुख पदापर्यंत पोचू शकलो. यावेळी त्यांनी राणे, घरत इ. शिक्षकांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला.

### स्मृतिदिन शासकीय इतमामाने साजरा होणे गरजेचे

लष्करप्रमुख अरूणकुमार वैद्य यांनी ''ऑपरेशन ब्ल्यू स्टार केल्यामुळे ते अतिरेक्यांच्या हिटलिस्टमध्ये गेले.'' शेवटी ते अतिरेक्यांकडूनच मारले गेले. या ''शहिदांचा १० ऑगस्ट हा स्मृतिदिन शासकीय इतमामाने साजरा होण्यासाठी ज्येष्ठ पत्रकार बळवंत वालेकर प्रयत्नशील आहेत. तशी विनंती जिल्हाधिकारी रायगड यांना दि.१५/९/२३ च्या पत्राने केली आहे. जिल्हाधिकारी यांनी जा.क्र साशा/कार्या-१/ब-२/अरुणकुमार वैद्य/दि. १०/१२/२०२३ नुसार सदर पत्र पुढील कार्यवाहीसाठी सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबईकडे पाठविले आहे. या विषयाचा पाठपुरावा मंत्रालयात वालेकर सर करीत आहेत. जनरल अरूणकुमार वैद्य यांच्या स्मृतीस अभिवादन.

### अतिरेक्यांकडून ''शहीद''

नियतवयोमानानुसार ते एप्रिल १९८६ साली सेवानिवृत्त झाले. आणि पुणे येथे ''आरोही'' बंगल्यात आयुष्याची सायंकाळ घालवू लागले. सुवर्ण मंदिरात ''ऑपरेशन ब्ल्यू स्टार'' केल्यामुळे ते अतिरेक्यांच्या हिटलिस्टमध्ये होते. वैद्य साहेब लष्करप्रमुखपदी असेपर्यंत त्यांना शासकीय संरक्षण होते. पण ते निवृत्त होताच त्यांचे शासकीय संरक्षण काढले गेले आणि अतिरेक्यांनी डाव साधला. अतिरेक्यांकडून त्यांची टेहळणी सुरू होती व १० ऑगस्ट १९८६ रोजी भल्या पहाटे डाव साधला गेला. अतिरेक्यांकडून ते ''शहीद'' झाले. संपूर्ण भारत देश दुःख सागरात बुडाला. त्यात अलिबागही मागे नव्हते. त्यावेळी सदर लेखक इंडस्ट्रियल हायस्कूलमध्ये सहा. शिक्षक शिवाय को.ए.सो.च्या विकास नियतकालिकाचे संपादक होते. अरूणकुमार वैद्य इंडस्ट्रियल हायस्कूलचे माजी विद्यार्थी असल्यामुळे वैद्य साहेबांचे नाव सदर हायस्कूलला द्यावे अशी चर्चा शहरात सुरू होती. पण फक्त चर्चाच होती. या चर्चेस मूर्त स्वरुप येण्यासाठी को.ए.सो.च्या श्रेष्ठींना भेटणे गरजेचे होते. याबाबत सदर लेखक इंडस्ट्रियल हायस्कूलचे तत्कालीन मुख्याध्यापक पटवर्धन सर यांना भेटले व नामकरणासाठी को.ए.सो. च्या श्रेष्ठींना भेटणे गरजेचे आहे, असे सांगितले. पण श्रेष्ठींना भेटण्यास पटवर्धन सर यांनी असमर्थता दर्शविली. शेवटी सदर लेखक रायगड बाजार येथे श्रेष्ठींना भेटले. त्याठिकाणी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रभाकर पाटील व रायगड बाजारचे सरव्यवस्थापक प्रतापराव सरनाईक बसलेले होते. ''शहीद'' अरुणकुमार वैद्य हे इंडस्ट्रियल हायस्कूलचे माजी विद्यार्थी आहेत. गतवर्षी त्यांनी आपल्या हायस्कूलला सदिच्छा भेट दिली होती. म्हणून इंडस्ट्रियल हायस्कूलला त्यांचे नाव द्यावे अशी सर्वत्र चर्चा आहे.'' असे म्हणताच रायगड बाजारचे जनरल मॅनेजर सरनाईक म्हणाले, ''वालेकर सरांची सूचना योग्य आहे. तेथे उपस्थित असलेले जि.प. अध्यक्ष प्रभाकर पाटील यांनीही या मागणीस दुजोरा दिला. लागलीच दत्ता पाटील म्हणाले, ''वालेकर सर, इंडस्ट्रियल हायस्कूलच्या शाळा समितीचा ठराव करून घ्या.'' या आदेशानुसार शाळा समितीचा ठराव करण्यात आला. तो को.ए.सो. कडे पाठविला गेला. आणि शिक्षण विभागाच्या मान्यतेनंतर को ए. सो. जनरल अरूणकुमार वैद्य माध्यमिक विद्यालय अलिबाग असे नामकरण केले गेले.

# कान्हा प्रियकर

**'कृष्णगान'**

**शशिकांत मुद्देबिहाळकर**

**९७६७१५२६०८**

मागील कवितेत कवीने कान्ह्याचे प्रेयसी म्हणून केलेले वर्णन आपण पाहिले. प्रेयसी महटलं की प्रियकर ओघानेच येतो. प्रस्तूत कवितेत कान्हा प्रियकर, कसा ते वर्णन कवी करतो. प्रियकराला प्रेयसीचा ध्यास लागलेला आहे. तिच्यासाठीच प्रियकराचा जीव टांगणीला लागलाय, जशी वाऱ्यावर ज्योत फडफडते तसा त्याचा जीव तडफडतोय, किती काळ मन धडधडते आहे, व्याकूळ होते आहे जसे एखाद्या बंदिस्त पिंजऱ्यात असलेल्या राघूचे व्हावे.




एकटेपणाचे दुःख असह्य होते आहे, न आवडणाऱ्या गोष्टी जशा अचानकपणे ऊगाचच हव्या हवयाशा वाटू लागतात तसे काहीसे. एकांती चटईवर पडता, दृष्टीस तीच प्रियतमा दिसते आहे, तिच्या मुखातून गोड वचने ऐकू येत आहेत, मधूर शबदांचे बोल मनाला फुलवत आहेत, तिचा विरह एखाद्या व्याधीसारखा असह्य होतोय, जणू तिचा नसलेला सहवास सहन होत नाहीए. प्रियकराची भूक हरपली आहे, त्याला निद्रा सोडून गेली आहे, अगदी फुलांचा गंधही नकोसा झालाय. प्रियकराचे मन अस्थिर झाले आहे, संभ्रमित झाले आहे, क्षणभराची शांतीही आणि सुखही मिळेनासे झाले आहे.

दुधाचा प्याला कटू लागतो आहे, शयनीमंचक काट्याने भरला आहे, एरवी मैनेचे मंजूळ वाटणारे स्वर कर्णकर्कश भासू लागले आहेत, वैद्यांनी तूजवीण जगणे शक्य नसलेचा सल्ला दिलाय, आणि ज्योतिषांनी ग्रह वक्री झाल्याचे सांगितले आहे. पण एके रात्री स्वप्नात कोणी अनोळखी आले, हृदयाशी भिडले सखये, जाग येताच विचारले, कोण आलं होतं इतक्यात? तर त्यांना काही ठाऊकच नव्हतं, भास असावा कदाचित पण, पण स्वप्नातून का होईना तूझा सहवास लाभला त्यानेच माझे मन आनंदाने भरून गेले, क्षणभर हृदयातून सुखाच्या लहरी वाहून आल्या, त्यासरशी भानावर येताच, बाहेरयेऊन पहातो तर जणू घर उजळून निघाल्यासारखे भासले, एक वेगळीच आशा जागी झाली, मन आनंदाने भरून गेले. कशाचेही भय नावालाही उरले नाही.

पुन्हा जग तुझ्या नुसत्या आभासी सहवासाने सुंदर दिसू लागले. तूझ्या स्पर्श सुखाने काया कोमल झाली. कोण असावा तो स्वप्नी आलेला शांतीदूत तुझ्या चिंतनाचा ध्यास हेच कारण असावे तू स्वप्नात प्रकट होण्याचे, असा तू माझा प्रियकर कान्हा आहेस. इथे कविता संपन्न होते.

(कवी प्रा. श्रीप्रकाश अधिकारी)

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)